दादा भगवान कथित

व्यसन मुक्तीचा मार्ग



Marathi

दादा भगवान कथित

व्यसन मुक्तीचा मार्ग

मूळ गुजराती संकलन : दीपकभाई देसाई

मराठी अनुवाद : महात्मागण

प्रकाशक : **अजीत सी. पटेल**
दादा भगवान विज्ञान फाउन्डेशन,
1, वरूण अपार्टमेंट, 37, श्रीमाळी सोसायटी,
नवरंगपुरा पुलिस स्टेशनच्या समोर, नवरंगपुरा,
अहमदाबाद - 380009, Gujarat, India.
फोन : +91 79 3500 2100, +91 9328661166/77

कॉपीराइट : © Dada Bhagwan Foundation,
5, Mamta Park Society, B\h. Navgujarat College, Usmanpura,
Ahmedabad - 380014, Gujarat, India.
Email : info@dadabhagwan.org
Tel : +91 9328661166/77

All Rights Reserved. No part of this publication may be shared, copied, translated or reproduced in any form (including electronic storage or audio recording) without written permission from the holder of the copyright. This publication is licensed for your personal use only.

प्रथम आवृत्ति : 1000 प्रती जून, 2026

भाव मूल्य : 'परम विनय' आणि
'मी काहीच जाणत नाही', हा भाव!

द्रव्य मूल्य : 50 रुपये

मुद्रक : अंबा मल्टीप्रिंट
एच.बी.कापडिया न्यू हाइस्कूलच्या समोर,
छत्राल-प्रतापपुरा रोड, छत्राल,
ता. कलोल, जि. गांधीनगर-382729, गुजरात
फोन : +91 79 3500 2142

ISBN/eISBN : 978-81-992022-3-8

Printed in India

त्रिमंत्र

नमो अरिहंताणं

नमो सिद्धाणं

नमो आयरियाणं

नमो उवज्झायाणं

नमो लोए सव्वसाहूणं

एसो पंच नमुक्कारो

सव्व पावप्पणासणो

मंगलाणं च सव्वेसिं

पढमं हवइ मंगलं ॥ १ ॥

ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ २ ॥

ॐ नमः शिवाय ॥ ३ ॥

जय सच्चिदानंद

दादा भगवान कोण ?

जून 1958 संध्याकाळची अंदाजे सहाची वेळ, सुरत स्टेशनवर अलोट गर्दी होती. रेल्वेच्या प्लेटफॉर्म नंबर तीनच्या बाकावर बसलेल्या श्री अंबालाल मूळजीभाई पटेल रुपी देहमंदिरात नैसर्गिक स्वरुपात कित्येक जन्मांपासून व्यक्त होण्यासाठी आतूर असलेले 'दादा भगवान' संपूर्णपणे प्रकट झाले आणि निसर्गाने सर्जन केले अध्यात्माचे अद्भुत आश्चर्य! एका तासात विश्वदर्शन लाभले! मी कोण ? भगवंत कोण ? जग कोण चालवत आहे ? कर्म म्हणजे काय ? मुक्ती कशाला म्हणतात ? इत्यादी जगातील सर्व आध्यात्मिक प्रश्नांची रहस्ये संपूर्णपणे प्रकट झाली. अशाप्रकारे निसर्गाने विश्वाला प्रदान केले एक अद्वितीय, संपूर्ण दर्शन आणि ह्याचे माध्यम बनले अंबालाल मूळजीभाई पटेल, जे होते गुजरातच्या चरोतर जिल्ह्यातील भादरण गावचे पाटील, कॉन्ट्रॅक्टचा व्यवसाय करणारे आणि तरीही पूर्ण वीतराग पुरुष.

त्यांना प्राप्ती झाली तशी ते फक्त दोन तासात इतर मुमुक्षुनां सुद्धा आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत, त्यांच्या सिद्ध झालेल्या अद्भुत ज्ञान प्रयोगाद्वारे. त्याला अक्रम (क्रमविरहीत) मार्ग म्हटले जाते. अक्रम म्हणजे क्रमाशिवायचा आणि क्रम म्हणजे पायरी पायरीने, क्रमाक्रमाने वर चढणे! अक्रम म्हणजे लिफ्ट मार्ग! शॉर्ट कट!

ते स्वत: प्रत्येकाला 'दादा भगवान कोण ?' याबद्दलची फोड करून देताना म्हणायचे की, ''हे दिसतात ते 'दादा भगवान' नाहीत. हे तर ए.एम. पटेल आहेत. आम्ही ज्ञानीपुरुष आहोत आणि आत प्रकट झाले ते दादा भगवान आहेत. दादा भगवान तर 'चौदालोक'चे नाथ आहेत, ते तुमच्यात पण आहेत, सर्वांमध्ये आहेत! तुमच्यात अव्यक्त रुपात आहेत आणि 'येथे' माझ्या आत संपूर्णपणे व्यक्त झालेले आहेत! माझ्या आत प्रकट झालेले 'दादा भगवान' यांना मी पण नमस्कार करतो.''

व्यापारात धर्म असावा परंतु धर्मात व्यापार नसावा. या सिद्धांताने त्यांनी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले. संपूर्ण जीवनात त्यांनी कधीही, कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत, उलट स्वत:च्या व्यवसायातून झालेल्या फायद्यातून भक्तांना यात्रा करवित असत.

आत्मज्ञान प्राप्तीची प्रत्यक्ष लींक

मी तर, काही लोकांना माझ्या हातून सिद्धी प्रदान करणार आहे. नंतर कोणीतरी हवा की नको! नंतर लोकांना मार्ग तर हवाच ना?

- दादाश्री

परम पूज्य दादाश्री गावोगावी, देशविदेश परिभ्रमण करून मुमुक्षुंना सत्संग आणि आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत. दादाश्रींनी आपल्या हयातीतच पूज्य डॉ. नीरूबहन अमीन (नीरूमा) यांना आत्मज्ञान प्राप्त करवून देण्याची ज्ञानसिद्धी प्रदान केली होती. दादाश्रींच्या देहविलयानंतर नीरूमा त्यांच्याप्रमाणेच मुमुक्षुंना सत्संग व आत्मज्ञान प्राप्ती निमित्त भावाने करवित असत. पूज्य दीपकभाई देसाई यांना दादाश्रींनी सत्संग करण्याची सिद्धी प्रदान केली होती. पू. नीरूमांच्या उपस्थितीतच त्यांच्याच आशीर्वादाने पूज्य दीपकभाई देश-विदेशात कित्येक ठिकाणी जाऊन मुमुक्षुंना आत्मज्ञान प्राप्ती करवित असत, हे कार्य नीरूमांच्या देहविलयानंतर आजसुद्धा चालूच आहे. या आत्मज्ञान प्राप्तीनंतर हजारो मुमुक्षु या संसारात राहून, सर्व जबाबदाऱ्या सांभाळत असताना सुद्धा मुक्त राहून आत्मरमणतेचा अनुभव घेत आहेत.

पुस्तकात मुद्रित वाणी मोक्षार्थीला मार्गदर्शनासाठी अत्यंत उपयोगी सिद्ध होईल, परंतु मोक्षप्राप्तीसाठी आत्मज्ञान प्राप्त करणे गरजेचे आहे. अक्रम मार्गाने आत्मज्ञानप्राप्तीचा मार्ग आजसुद्धा चालुच आहे. जसा प्रज्वलित दिवाच दुसऱ्या दिव्याला प्रज्वलित करू शकतो, त्याचप्रमाणे प्रत्यक्ष आत्मज्ञानींकडून आत्मज्ञान प्राप्त करूनच स्वत:चा आत्मा जागृत होऊ शकतो.

निवेदन

ज्ञानी पुरुष संपूज्य दादा भगवान यांच्या श्रीमुखातून अध्यात्म आणि व्यवहारज्ञाना संबंधीत जी वाणी निघाली, तिला रेकॉर्ड करून संकलन व संपादन करून पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित केले जात आहे. विभिन्न विषायांवर निघालेल्या सरस्वतीचे अद्‌भुत संकलन ह्या पुस्तकात झाले आहे, जे नवीन वाचकांसाठी वरदान रूप सिद्ध होईल.

प्रस्तुत अनुवादामध्ये विशेष लक्ष ठेवलेले आहे की प्रत्येक वाचकाला दादाश्रींची प्रत्यक्ष वाणीच ऐकली जात आहे असा अनुभव व्हावा. याच कारणाने कदाचित काही ठिकाणी अनुवादाची वाक्य रचना मराठी व्याकरणानुसार त्रूटीपूर्ण जाणवेल, परंतु तिथे जर आशय समजून वाचण्यात आले तर अधिक लाभदायी होईल.

प्रस्तुत पुस्तकात काही ठिकाणी कंसात दर्शविलेले शब्द किंवा वाक्य दादाश्रींद्वारा बोलल्या गेलेल्या वाक्यांना अधिक स्पष्टतापूर्वक समजावण्यासाठी लिहिले गेले आहेत. तसेच काही ठिकाणी इंग्रजी शब्दांना मराठी अर्थाच्या रूपात ठेवले गेले आहेत. दादाश्रींच्या श्रीमुखातून निघालेले काही शब्द जसेच्या तसेच *इटालिक्स* मध्ये ठेवलेले आहेत, कारण त्या शब्दांसाठी मराठी भाषेत असे शब्द नाहीत की जे त्याचा पूर्ण अर्थ देऊ शकतील. तरी पण त्या शब्दांचे समानार्थी शब्द कंसात तसेच पुस्तकाच्या शेवटी पण लिहिले गेले आहेत.

ज्ञानींच्या वाणीला मराठी भाषेत यथार्थ रूपाने अनुवादित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु दादाश्रींच्या आत्मज्ञानाचा आशय जसा आहे तसा तर आपल्याला गुजराती भाषेतच अवगत होईल. ज्यांना ज्ञानाचा गहन अर्थ समजून घ्यायचा असेल, ज्ञानाचे खरे मर्म समजायचे असेल त्यांनी ह्या हेतूने गुजराती भाषा शिकावी असा आमचा अनुरोध आहे. अनुवादासंबंधी उणीवांबद्दल आपले क्षमा प्रार्थी आहोत.

❖❖❖❖❖

संपादकीय

व्यसनातून मुक्त होणे अत्यंत कठीण आहे, अशी मान्यता सर्व व्यसनग्रस्त लोकांची असतेच. मग ती ड्रग्स, अल्कोहोल (दारू) अशी अत्यंत धोकादायक व्यसने असोत किंवा चहा, पान, सिगारेटसारखी इतर व्यसने असोत. ज्यांना व्यसन सोडायचेच असते, आणि व्यसन सोडायचा अनेकवेळा प्रयत्न करूनही जेव्हा त्यांना त्यात यश मिळत नाही, तेव्हा ही मान्यता आणखी आणखी दृढ होत जाते. आणि मनात 'मला व्यसन सोडायचे आहे तरी सुटत का नाही?' असे न सुटलेले प्रश्न सतत उभे असतात. व्यसन थोडा काळ सुटते पण परत का चिकटते?

म्हणून व्यसन वस्तूतः काय आहे, ते कसे लागते, त्याचा आधार काय असतो, तो आधार कशा प्रकारे नष्ट करावा... इत्यादी संबंधी सविस्तर माहिती परम पूज्य दादा भगवान यांनी येथे उघड केली आहे. ते म्हणतात की विषाला खरोखर विषच आहे असे समजले तर मग तो स्पर्शच करणार नाही! व्यसन हा कशा प्रकारे धोकादायक आहे, याची सविस्तर समज दादाश्री फिट करून देतात. आणि ती समजच व्यसनाबद्दलचा त्याचा अभिप्राय बदलून त्याला त्या व्यसनापासून मुक्त करील.

दुसऱ्या बाजूने व्यसनात सुख वाटते अशा व्यक्तीला पण हे प्रश्न पडतात की मला तर यात सुखच वाटते, त्याचे काय? व्यसन वाईट आहे असा दृढ निश्चय होत नाही, तर काय करावे? त्यावर दादाश्री सांगतात की वास्तवात व्यसन हा आनंद देत नाही. तुम्हीच तुमच्या सुखाचा क्वोट्यातून (वाट्यातून) आज सुख ओढून घेऊन त्याचा उपयोग करता, नंतर भविष्यात हे सुख कमी पडेल. खरे तर तुम्ही आनंद मिळवत नाही पण आनंद गमावता.

दारूसारख्या नशायुक्त पदार्थासाठी दादाश्री लालझेंडा दाखवितात. सांगतात की हे व्यसन माणसाला बेहोश करते आणि माणसातून जनावरगतीकडे घेऊन जाते. याशिवाय यात भरपूर हिंसा पण आहे.

प्रगत जनतेने दारूला स्पर्श पण करू नये. इतर व्यसनातील धोके समजावून सांगताना दादाजी म्हणतात की विडी, सिगारेट, तंबाखू वगैरे सर्व व्यसने शरीराचे नुकसान करतात, कॅन्सरसारखे रोग उत्पन्न करतात आणि इमोशनल करतात. चहाचे व्यसन पण मनाला चंचल बनविते. तरीही दारूसारखी व्यसने सुटत नसतील तर पान-सुपारी किंवा सिगारेट अशा छोट्या व्यसनात येऊन दारूतून त्वरीत सुटून जावे. त्यानंतर इतर व्यसनातून देखील स्टेपींगने (पायरीपायरीने) हळूहळू मुक्त व्हायला हवे.

प्रत्येक व्यसन माणसाच्या स्वातंत्र्यावर हल्ला करते आणि त्याला परतंत्र बनवते. आपल्याला अशा व्यसनांच्या ताब्यात राहावे लागते आणि त्याच्या पारतंत्र्यात राहावे लागते, हे कसे सहन होईल? अशा व्यसनांच्या जाळ्यात अडकलेल्या सर्व लोकांसाठी ही दादाश्रींची ज्ञानवाणी एक नवीनच उपाय दाखविणारा ज्ञानप्रकाश होईल.

या पुस्तकात दादाजींनी व्यसनांतून मुक्त होण्याचे विविध उपाय सांगितले आहेत. त्यापैकी एक उपाय आहे चार स्टेप्सची (पायऱ्यांची) एक विलक्षण पद्धत. त्या पद्धतीत,

1) व्यसन वाईट आहे असा दृढ निश्चय करायचा आहे,

2) ते कशा प्रकारे वाईट आहे याची माहिती एकत्र करून जागृतीत ठेवायची आहे.

3) निश्चय करूनही परत जितक्या वेळा व्यसन केले जाते तितक्यावेळा प्रतिक्रमण-प्रत्याख्यान करायचे, आणि

4) कोणी याबाबत तुमची चूक दाखविली, तुमचा अपमान केला, तरी पण व्यसनाचे समर्थन करायचे नाही.

आणि जे अजून व्यसनात गुंतलेले नाहीत त्यांना सावध करताना दादाश्री सांगतात की व्यसनात पडण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे व्यसनींची संगत! ही संगत तुम्हाला केव्हा व्यसनात पाडील त्याचा भरवसा नाही. म्हणून त्या कुसंगापासून सावध राहणेच श्रेयस्कर.

ज्या व्यक्तीला व्यसन आहे अशा व्यक्तीला तर या पुस्तकातून खूप काही किल्ल्या मिळतील, एवढेच नाहीत तर स्वत:च्या जवळच्या व्यक्तीला किंवा कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला जर व्यसन असेल तर त्या व्यक्तीशी समजपूर्वक व्यवहार कसा करावा, यासाठी दादाश्रींना दिलेली समज पण नवीन दृष्टीकोण देईल. जेणेकरून स्वत:ला राग-द्वेष होणार नाहीत आणि समोरची व्यक्ती पण व्यसनमुक्त होण्यासाठी सकारात्मक सही करील.

विविध व्यसनात अडकलेल्या व्यक्तींना सतावणाऱ्या प्रश्नांच्या समाधानासाठी निमित्ताधीन ही दादाश्रींची ज्ञानवाणी बाहेर पडली आहे. तिचे, इथे एकसूत्रता वाटेल आणि वाचकाला व्यसनांतून सुटण्याचे सुव्यवस्थित उत्तर मिळेल अशाप्रकारे संकलन करायचा प्रयत्न केला आहे, यात जर कुठे त्रुटी आढळल्या तर त्या ज्ञानवाणीच्या नसून संकलनाच्याच असू शकतात. त्यासाठी हृदयपूर्वक क्षमायाचना.

जय सच्चिदानंद

अनुक्रमणिका

[1] व्यसन म्हणजे काय? व्यसन कशाला म्हणतात? 1

[2] व्यसन कसे लागते? 4

[3] व्यसनांचे धोके आणि परिणाम 9

[3.1] चहा, विडी वगैरे व्यसनांचे धोके आणि परिणाम 9

[3.2] अल्कोहोलयुक्त पेये अत्यंत धोकादायक 12

[3.3] व्यसनींचा सहवास म्हणजे खूप मोठा धोका 23

[4] व्यसनांपासून सुटू शकतो का? 26

[5] व्यसनांपासून सुटण्याचे प्राथमिक उपाय 29

[5.1] दारूच्या व्यसनांपासून सुटण्याचे उपाय 29

[5.2] इतर व्यसनांतून सुटण्याचे उपाय 33

[6] व्यसनांपासून सुटण्याचा 'चार स्टेपचा' विलक्षण मार्ग 35

[7] कुटुंबात कोणाला व्यसन असेल तर... 42

[8] अक्रम विज्ञानाची ही देणगी-व्यसनीला मोक्षमार्गाकडे वळविले 45

व्यसन मुक्तीचा मार्ग

[1] व्यसन म्हणजे काय? व्यसन कशाला म्हणतात?

शरीराला अनावश्यक असलेला आहार म्हणजे व्यसन

प्रश्नकर्ता : दादा, व्यसन म्हणजे काय?

दादाश्री : व्यसन म्हणजे काय? व्यसन शब्द कशापासून बनला आहे? 'असन' या शब्दापासून व्यसन हा शब्द बनला आहे या शरीराला जे आवश्यक आहे त्याला असन म्हणतात आणि जे अनावश्यक आहे त्याला व्यसन म्हणतात. असन म्हणजे आहार आणि व्यसन म्हणजे विशेष आहार, विशेष असन. अतिरेक, म्हणजे ज्यांची गरज नाही, त्याच्याशिवाय शरीर चालू शकते. आहाराची, असनची गरज आहे, पण व्यसनाची गरज नाही. या विडीची काही खास नेसेसिटी (गरज) नाही. मग तुम्ही ती का जवळ ठेवत आहात? चहा, विडी, पान, तंबाखू वगैरे गोष्टी ज्यांच्याशिवाय चालू शकते, अशा गोष्टींना व्यसन म्हणतात.

प्रश्नकर्ता : आम्हालाही खूप सिनेमे बघायचे व्यसन लागले असेल तर?

दादाश्री : त्याला हरकत नाही. सिनेमा बघणे याला व्यसन म्हणत नाहीत. व्यसन म्हणजे ज्यात इनटॉक्सिकेशन (नशा) आहे, अशा गोष्टी. त्यांच्याशिवाय तुम्हाला राहवतच नाही. त्या तुम्हाला परवश करतात. ज्या तुम्हाला वश करतात, त्यांना व्यसन म्हणतात. सिनेमाच्या बाबतीत तुम्हाला तुमचे मित्र बोलवतात, पण तुम्हाला जायचे नसेल तर

तुम्ही नाही म्हणता, त्याला व्यसन म्हणत नाहीत, याला तर सवय लागली आहे असे म्हणतात.

प्रश्नकर्ता : तर मग या व्यसनाला सवय का म्हणत नाहीत? सिनेमा बघण्याला सवय का म्हणतात?

दादाश्री : सवय म्हणजे त्यात मनाचा आहार असतो, पण त्यात शरीर आणि वाणी यांचा आहार नसतो. पण या व्यसनांमध्ये शरीराचा आहार असतो. सिनेमा बघणे याला व्यसन म्हणत नाहीत. त्याला सवय म्हणतात. व्यसन म्हणजे या शरीराद्वारे घ्यावे लागते. बाह्य वस्तूला सवय म्हणतात. जे शरीराशी संबंधित असते त्याला व्यसन म्हणतात.

प्रश्नकर्ता : व्यसन आणि सवय यातील डिमार्केशन (भेदरेखा) फारच सूक्ष्म आहे, कोणाला सहज समजत नाही.

दादाश्री : हो, लक्षात येत नाही. व्यसन म्हणजे नेमके काय, ते जगाला माहीतच नाही ना! लोक सवयीला व्यसन म्हणतात, आणि व्यसनाला सवय म्हणतात. असे उलट बोलतात.

इनटॉक्सिकेटिंग - नशा आणणाऱ्या वस्तूंचे व्यसन लागते

प्रश्नकर्ता : म्हणजे मग दादा, व्यसन तर ज्ञानतंतूचेच झाले ना?

दादाश्री : हो, ज्ञानतंतूचे व्यसन. हे पाहा, विडी, चहा, दारू... आणि सुपारीसुद्धा थोडी ज्ञानतंतूच्या व्यसनासारखी आहे. चहाच्या स्वभावाच्या ज्ञानतंतूवर परिणाम होतो पण विडी इतका परिणाम होत नाही. विडी तर जास्त परिणामकारक आहे. तंबाखू तोंडाने खात असेल तरी ती परिणामकारक आहे. तपकीर ओढत असेल तर तीही परिणामकारक आहे. या सर्व गोष्टी ज्ञानतंतूवर परिणाम करणाऱ्या आहेत. आणि जर सकाळी दूध पीत असाल तर ते ज्ञानतंतूवर परिणाम करणारे नाही. जर दूध प्यायचे राहून गेले तर बैचेनी वाटत नाही. दुधाचे व्यसन लागत नाही. ज्या गोष्टी इनटॉक्सिकेटिंग (नशाकारक) आहेत त्यांचे व्यसन लागते. दही खा, दूध प्या, आईस्क्रीम खा, त्याला हरकत नाही.

ताकसुद्धा पिऊ शकता, खूप गोष्टी आहेत. त्या सवय लावणाऱ्या गोष्टी नाहीत. त्यात नशाच नाही ना? चहाची सवय लागते, सिगारेटची सवय लागते, सवय म्हणजे हॅबिच्युएटेड, त्याच्याशिवाय राहवतच नाही. सवय लागता कामा नये. आणि सवय लागलीच असेल तर ती हळूहळू कमी करायला हवी, किंवा संपूर्ण मोडून टाकायला हवी.

रोगामुळे होते व्यसन, हा आगळावेगळा शोध

प्रश्नकर्ता : दादा, आपण म्हणालात ना की चहा-सिगारेटची सवय लागते, तर त्याला सवय म्हणावे की व्यसन?

दादाश्री : खरे तर ते व्यसन आहे, जगातील लोक त्याला सवय म्हणतात पण आम्ही तर त्याला रोगच म्हणतो. सवय कशाला म्हणतात? तर जी तुम्ही सोडू शकता. पण लोक तर म्हणतात की त्याला दारूची सवय लागली आहे. अरे भाऊ, ही कसली सवय बिवय? उलट दारू पिणाऱ्यावर तर करुणा बाळगायला हवी, उगाच त्या बिचाऱ्याला असे का म्हणता? लोक म्हणतात सवय सोडा, सवय सोडा. अरे, पण ती अशी कशी सुटणार? जी सोडाविशी वाटली तर सोडता येते, तिला सवय म्हणतात आणि जी सोडाविशी वाटली तरी सोडता येत नाही तिला रोग म्हणतात. पण हे समजत नाही, म्हणून मग लोक म्हणतात की वाईट सवय लागली आहे.

एक मनुष्य दारू पितो तो सुद्धा रोग आहे आणि दुसरा हुक्का पितो तो पण रोग आहे. ही जी सगळी व्यसने आहेत ती देखील रोगच आहेत. परंतु डॉक्टर आणि सर्व जग काय म्हणते की 'तू विनाकारण व्यसन करत आहेस.' अरे बाबा, तो रोग आहे. विनाकारण करत असता तर ते दुसऱ्या दिवशी सुटले असते. जेव्हा बंद करायचे असेल तेव्हा बंद करता येते. पण तो तर रोग आहे, मग काय करणार? आता हा जो विड्या ओढतो, त्या विड्यामुळे आत जो रोग उत्पन्न होतो, तो रोगच त्याला परत विडी ओढायला लावतो. ज्याला वातविकार झाला असेल, त्याला जर जेवताना पाहिले तर तो वातूळ पदार्थच खात असतो.

कारण त्याला वात आहे म्हणून तो वातूळ पदार्थच खातो. म्हणजे रोगच खात असतो, रोग दारू पितो, रोग विड्या ओढतो, रोग सिगारेट ओढतो. सर्व काही रोगच करत असतो. आता जर त्या रोगाचा नाश केला गेला तर विडी ओढणे बंद होईल. म्हणजेच हे व्यसन सोडल्याने सुटेल असे नाही. तो रोग आहे, आणि त्यावर जर योग्य औषध दिले गेले तर तो रोग पूर्ण बरा होऊ शकतो.

व्यसने ही व्यसने नाहीत, तर रोग आहेत. तो रोग जर एका मर्यादेपर्यंत झाला असेल तर तो सुटू शकतो. नंतर जर तो रोग वाढला तर तो रोगच त्याला पकडून ठेवतो. व्यसन हा रोग आहे असे आम्ही म्हटले आहे. फॉरेनच्या लोकांना अजून हे माहीतच नाही की हा रोग आहे. त्यांना जर समजले की हा रोग आहे तर त्यांनी यावर औषध शोधून काढले असते. सिगारेट ओढतात, ते काय आहे? ज्ञानतंतूच्या निर्बलतेचा हा रोग आहे. जर ज्ञानतंतूवर औषधोपचार केले तरच सिगारेट ओढणे बंद होईल. रोगच जर संपला तर वाईट सवय सुटेल. हा आमचा शोध आहे! कोणाला या प्रकारचे तर कोणाला त्या प्रकारचे रोग आहेत. रोग असेल तर त्यावर औषध देता येते. आम्ही त्या रोगाचे औषध शोधून काढू!

[2] व्यसन कसे लागते?

व्यसन, हा स्वतःच्या इच्छेचा परिणाम आहे

प्रश्नकर्ता : दादा, व्यसने अशी सहजप्रकारे लागत राहतात.

दादाश्री : व्यसने ही आपखुदी (स्वतःवर स्वतः केलेले जुलूम) आहेत. लोक व्यसनांच्या रूपाने शरीरावर आपखुदी (स्वतःचा सर्वोपरी अधिकार) करत असतात.

प्रश्नकर्ता : तो सहजभाव नाही का? त्यात सहजभाव नाही?

दादाश्री : नंतर सहजभाव होतो. प्रथम स्वतः आपखुदी करतो. नंतर ते सहज होते. शरीर तर बिचारे, त्याला जशी सवय लावाल, त्या

वाटेने धावू लागते. पण (प्रथम) स्वतः शरीरावर आपखुदी करतो. शरीरावर आपखुदी करू नये.

प्रश्नकर्ता : आम्हाला व्यसन करण्याची आतून इच्छा नसते तरी पण व्यसनात अडकत जातो.

दादाश्री : तुम्हाला घरातून बाहेर निघायचे नसेल तर निघता येईल का? तुम्ही बाहेर निघून जाता का?

प्रश्नकर्ता : आपणहून तर निघत नाही.

दादाश्री : इच्छा नसेल तर काहीही होणार नाही. विडी हा इच्छेचा परिणाम आहे. इच्छा आहे म्हणूनच विडी ओढतात, नाहीतर कधीच ओढणार नाहीत. ज्याला इच्छा असते तोच दारू पितो, ज्याला इच्छा नाही तो दारू पीत नाही. आत इच्छा करणारा बसला आहे, म्हणून हे सर्व जाळ्यात अडकत राहतात. इच्छाच नसेल त्याला काही होणार नाही.

प्रश्नकर्ता : आत्ता ज्या इच्छा होत असतात त्या तर आपोआपच होत असतात, मग त्यात आपण काय करू शकतो?

दादाश्री : आत्ता इच्छा करत नाही पण या पूर्वी तर करत होता ना? केल्याशिवाय इच्छा कशी होईल? तुम्हाला विडी ओढण्याची इच्छा आहे म्हणून तुम्ही विडी ओढता आणि विडी ओढण्याची इच्छा नसेल तर तुम्ही विडी ओढणार नाही. ज्याला विडी ओढण्याची इच्छाच नसते, त्याची अशी कर्मे नसतात. म्हणजेच इच्छा असलेल्यालाच अशी कर्मे असतात आणि इच्छा नसणाऱ्याला अशी कर्मे नसतात.

दिसणारे पुरावे मिळताच लफडे लागू होते

या भाऊंना कितीतरी लफडी लागली आहेत. सिगारेट-बिगारेट वगैरे सर्व, किती व्यसने! पुरावे मिळताच लफडे लागते! सर्व प्रकारचे एव्हिडेन्सेस (पुरावे) एकत्र आले की लफडे चिकटतेच!

प्रश्नकर्ता : पुरावे मिळताच? पुरावे म्हणजे नेमके काय?

दादाश्री : ही जी विडी आहे ते एक लफडेच आहे. तर त्यासाठी कोणकोणते पुरावे एकत्र येतात? प्रथम त्याला तशी मित्रमंडळी भेटते, आता यात जो विडी ओढत नाही तो म्हणतो 'नाही, याने तर माझे डोके दुखते.' पण मग दुसरा म्हणतो 'थोडी ओढून तर बघ ना, दोन झुरके मार.' असे करत करत त्याच्याकडून खूप झुरके मारून घेतात आणि मग असे करत करत हे लफडे लागते. असे सर्व पुरावे गोळा झाले की हे लफडे लागते. आणि जर विड्या ओढत नाहीत अशा चांगल्या माणसांकडे गेला असेल तर असे लफडे लागेल काय? म्हणजेच असे सारे पुरावे एकत्र येतात तेव्हाच व्यसन चिकटते. दिसणारे पुरावे बरे का, सरकमस्टेन्शियल एव्हिडेन्सेस (सांयोगिक पुरावे) नाही तर दिसणारे पुरावे! तुमच्या कोर्टात दिसणारे पुरावे लागतात ना? प्रत्यक्ष डोळ्याला दिसतील असे पुरावे लागतात ना? तर हे पण असेच दिसणारे पुरावे आहेत.

प्रश्नकर्ता : ही जी व्यसनांची सवय लागते, ती चित्तामुळे लागत असते का?

दादाश्री : ती चित्तामुळे लागते पण चित्त तर सगळ्यांनाच असते. चित्त तर आतासुद्धा आहेच ना? मग आता का सवय लागत नाही? ती उलट पाहण्यामुळे लागते. या जगाचे सगळे पाहणे उलटेच आहे ना, उलटे पाहिले की सवय लागते. मग ती जाता जात नाही.

प्रश्नकर्ता : एकमेकांचे पाहून पाहून सवय लागते का?

दादाश्री : होय. आणि काय हितकर, काय अहितकर असे कधी पाहतात का? समोरचा म्हणतो 'एक तरी झुरका मार, एक तरी मार', तर म्हणेल 'हो मारतो', म्हणजे तो अहंकार करतो की 'हो, मी पण झुरका मारीन.' समोरचा म्हणतो 'असा मारतात झुरका!' मग तो पण पहिला झुरका मारतो. सुरुवातीला तर चकरा येतात पण तिकडे लक्ष देत नाही. आणि मग त्याचे सुरू होते. अहंकाराचा स्वभाव असा आहे की तो सर्व शिकतो आणि शिकविणारे मिळतात सुद्धा. दुसऱ्यांचे पाहून तो शिकतो. आणि एकदा तो त्यात अडकल्यानंतर सर्व मित्र निघून

जातात. कोणीच सोबत राहत नाहीत. नंतर मग तो एकटाच बोंबाबोंब करत बसतो. वीस-वीस सिगारेटी घेऊन फिरत असतो! म्हणजेच लोकांनी दाखविलेल्या मार्गाने अहंकार सुख शोधत असतो. आणि मग तो त्या व्यसनातच अडकून राहतो.

अभिप्रायामुळे गाठ बसते, पुढच्या जन्मात संयोग मिळताच ती फुटते

काही लोकांनी तर कधी स्पर्श पण केला नसेल, तरी पण त्यांच्या मनात विचार येतात की 'हे करण्यासारखे आहे.' पण त्यामुळे पुढच्या जन्मासाठी गाठ बसते. जेव्हा तुम्ही एखाद्या ब्रँडी पिणाऱ्या माणसासोबत जाता तेव्हा तुम्ही तिथे एक-दोन वेळा तर ब्रँडी पीत नाही. त्यानंतर मात्र तुमच्या मनात असे येते की पिण्यात काय हरकत आहे? पण तरी तुम्ही पिऊ शकला नाहीत. तुमचा अभिप्राय तर बदलला पण अजून पिणे जमले नाही. पिण्याचा योग जुळला नाही. पण झाले काय? तर त्यावेळी ही गाठ बसली. तुमच्या त्या अभिप्रायामुळे मन तयार झाले, आणि गाठ बसली. मग ती गाठ पुढच्या जन्मात फुटते तेव्हा तुम्ही विडी ओढता. त्या गाठीमुळे मग पुन्हा संयोग एकत्र येतात. एव्हिडेन्स मिळाल्यावर गाठ फुटते. त्याला संयोग मिळाले, त्याचा मित्र-बित्र भेटला, तसे दुकान सापडले की मग ही गाठ फुटते.

प्रश्नकर्ता : तुम्ही असे म्हणालात की सांयोगिक पुराव्यांमुळे मित्रांच्या संगतीमुळे त्याला विचार येतात. परंतु ज्यांच्याबरोबर तो मैत्री करतो, किंवा मैत्री करण्याची त्याला प्रेरणा होते आणि ज्यांच्याकडून तो हे सर्व स्वीकारतो, त्यांच्यासारख्या सवयी लावण्याची सुरुवात करतो, तर मग ती सवयी लावून घेण्यासाठी त्याला मार्गदर्शन कोण करतो?

दादाश्री : तसा स्वभावच आहे. चुकीच्या व्यक्तीबरोबर सहवास केला की तुम्हाला चुकीच्या सवयी लागतात. चुकीच्या व्यक्तीशी मैत्री होते त्याचे कारण तुमचा पूर्वजन्मीचा काही दोष असावा, म्हणूनच तुम्हाला तसा संयोग मिळतो. पण तो संयोग जर लवकर सुटला तर चांगले.

संयोग सुटतात हे तर नक्की, पण काही संयोग तर संपूर्ण आयुष्यभर टिकतात. पण तरी संयोग आहेत, म्हणून कधी न कधी तर सुटणारच.

व्यसने बुद्धीच्या निर्णयामुळे होतात आणि सुटतात

प्रश्नकर्ता : या व्यसनांना बुद्धी जबाबदार आहे का?

दादाश्री : बुद्धीच जबाबदार आहे ना! बुद्धीच चांगले-वाईट असा निर्णय घेत असते आणि निर्णय झाला की व्यसन लागते, नाहीतर आपोआप लागत नाही. चांगले की वाईट याचा निर्णय घेणे हे बुद्धीचे काम आहे.

प्रश्नकर्ता : परंतु दादा, एखादा खूप विड्या ओढत असतो आणि मग जेव्हा त्याला हार्ट अटॅक येतो, तेव्हा डॉक्टर म्हणतात की आता 'विड्या ओढणे बंद करा.' तेव्हा त्याला समजते की हे तर नुकसानकारक आहे, म्हणून मग तो विडी सोडून देतो.

दादाश्री : हो, म्हणजेच बुद्धीचे काम नफा-तोटा पाहणे हे आहे. बुद्धीला जेव्हा नफा-तोटा समजतो, तिला जेव्हा कोणी असे दाखवते की यात काय फायदा आहे आणि यात काय तोटा आहे, त्रास आहे वगैरे वगैरे... तेव्हा त्याला कळते की हे तर नुकसान आहे!' तेव्हा मग बुद्धी त्याला ते सोडायला सांगते. म्हणजेच करते पण बुद्धीच आणि सोडते पण बुद्धीच. पण बुद्धीला नफा-तोटा समजतो. मी पण तेवढेच दाखवतो की यात काय फायदा? हे तर भूत लागल्यासारखेच संकट आहे, भुताटकी झाली आहे. तेव्हा त्याला समजते. समजदार आणि संस्कारी असेल तर त्याला पटकन समजते की बाबा रे, खरेच हे मोठे संकट आहे! मग ते सुटते. बुद्धीची पकड थोडीशी सैल झाली की सुटते. आपोआपच सुटते. पण बुद्धी आपली पकड सैल करतच नाही. चहा, विडी असे काही सोडायचे असेल तर बुद्धी पकड सैल करतच नाही. आणि जर तिने पकड सैल केली तर व्यसन सुटते. पण ती पकड सैल करतच नाही. ती सैल केव्हा करते? तर तिला जेव्हा कोणी नफा-तोटा एक्झॅक्टली (नीटपणे) समजावून सांगतो तेव्हाच!

[3] व्यसनांचे धोके आणि परिणाम

[3.1] चहा, विडी वगैरे व्यसनांचे धोके आणि परिणाम

व्यसनांची आठवण येते आणि सहजपणा संपतो

व्यसन तर एक संकट आहे यातना देणारे, त्रास देणारे संकट आहे. एकदा ते चिकटल्यावर जर तसे झाले नाही तर संपूर्ण दिवस व्यर्थ जातो. व्यसनांचे सेवन करूच नये.

प्रश्नकर्ता : व्यसन आम्हाला चिकटले आहे की आम्ही व्यसनाला चिकटलो आहोत?

दादाश्री : व्यसन तर वीतराग आहेत. तंबाखू तर वीतराग आहे. तुम्ही तिला चिकटाल तर मग तिचा परिणाम तर होतच राहणार, परिणाम मग सुटत नाही. तुम्ही विचार करायला हवा होता. चहाची सवय करून पाहा आणि मसाला दुधाची सवय करून पाहा. मसाला दूध तुम्हाला चिकटणार नाही पण चहा मात्र चिकटेल. कारण चहात इनटॉक्सिकेशन (नशा) आहे. म्हणजेच आपण कोणाबरोबर मैत्री करत आहोत याचा विचार पहिल्यापासूनच करायला हवा.

तुम्ही यात्रेला गेला आणि सकाळपासून काहीच मिळाले नाही तर पहिली आठवण कशाची येते?

प्रश्नकर्ता : चहाची आठवण येते.

दादाश्री : आठवण येते, आणि आठवण आली की ती त्रास देते. कशाचीही आठवण येणार नाही असे जीवन असायला हवे. पण ही व्यसने आठवण करवितात. ज्यांची आपल्याला आठवण येते आणि आपला सहजपणा संपतो, अशा सर्व गोष्टींना मादक पदार्थ म्हणतात. चहाची आठवण येते. कॉफीची आठवण येते. याउलट दूध पितो किंवा जिलबी खातो तेव्हा अशी काही आठवण येत नाही. आणि समजा जर जिलबी खाण्याची पंधरा दिवसांची, किंवा महिन्यांची सवय झाली असेल तर दोन-तीन दिवस आठवण येईल, मग नंतर येणार नाही. तुम्ही

विसरून जाल. परंतु जर तुम्ही चहा पित असाल, आणि एक दिवस चहा मिळाला नाही, सात वाजले, आठ वाजले की त्यानंतर तुम्ही चहाच्या ध्यानात पडाल. कसल्या ध्यानात पडाल?

प्रश्नकर्ता : चहाच्या ध्यानात.

दादाश्री : चहा तुमचा ताबा घेतो. पूर्ण ताबा घेतो, तेव्हा जर कोणी काही विचारले 'का बसला आहात?' तर तुम्ही म्हणता 'अहो, अजून चहा आला नाही, तर संडासला कसे जाऊ?' म्हणजे संडास बिचारा आता चहाच्या आधारावर अवलंबून आहे! केवढा हा गोंधळ? आणि मग फक्त चहाच नाही, तर सिगारेटही हवी असते, तेव्हा संडासला होते! पाहा, कशात अडकून राहतो? तू अवलंबून राहिलास म्हणून तुझे स्वातंत्र्य नष्ट झाले. तुला असे पारतंत्र्य चांगले वाटते का? अवलंबन म्हणजेच पारतंत्र्य! चहाचे पारतंत्र्य, सिगारेटचे पारतंत्र्य! चहा-सिगारेट मिळाली नाही तर देवाची आठवण येत नाही पण चहा-सिगारेट मात्र आठवतात! अशा चहा-सिगारेटच्या देवाऐवजी आपले हे बिचारे देव किती चांगले! आणि पाहा ना, तोंड सुगंधी बनते (!) सात रुपयांची सिगारेट ओढता, तेव्हा तोंड, मस्त सुगंधीदार, होते ना? अरे! तोंडाला वास येतो. त्याला स्वत:ला वास येत नाही पण समोरच्याला तर वास येतोच.

इनटॉक्सिकेशन अनंत जन्म खराब करते

प्रश्नकर्ता : ह्या ज्या चहा, कॉफी अशा गोष्टी आहेत, त्या पण मनासाठी चांगल्या नाहीत, असे म्हणतात, ते बरोबर आहे ना?

दादाश्री : ही सगळी नशा आणणारी पेय आहेत ना? हा चहा पिऊन उत्तेजनाच येते ना, आणखी दुसरे काय? चहा पितो तेव्हा आत जो जोश आहे तो प्रकट होतो, त्यामुळे मग आतील जोश कमी होतो. नवीन जोश उत्पन्न होत नाही. आपलाआपण जो जोश येतो त्याला नैसर्गिक म्हणतात, आणि हा तर आतून उत्पन्न केला आहे. औषधे देऊन उत्पन्न करतात, ते पण असेच, याच्यासारखे असते. म्हणजेच नशा, मादकपणा अशा गोष्टी असता कामा नयेत.

तुम्हाला पारतंत्र्य आहे का? चहा-सिगारेट वगैरे सर्व?

प्रश्नकर्ता : नाही, दादाजी आता तर ही पान आणि पुडीची आसक्ती खूप लागली आहे.

दादाश्री : असे होय? पान वेगळे आणि मसाला (तंबाखू) वेगळा? असे आहे का?

प्रश्नकर्ता : हो, म्हणजे प्लॅस्टीकच्या कागदात बांधून देतात, ती पुडी आणि पान वेगळे.

दादाश्री : पाहा, किती पुण्यशाली लोक! मी माझ्या घरी 1936 साली पानाची डबी आणली होती, घरी पान खायला! मग एक-दोन महिने त्यात पाने ठेवून खाल्ली. मग ती डबी अशीच पडून राहिली, रिकामीच पडून राहिली आहे. हीराबा ती डबी घासून स्वच्छ करतात. विनाकारण ही कसली भानगड! आपण जेवढे आणतो तेवढे मग आपल्याला सांभाळावे लागते. डबी सांभाळून ठेवावी लागते. आपल्याला पान आणायला जावे लागते. आपण जातो पण पानाचे दुकान बंद असते. आपण जिथून पान आणून खातो ते बंद असते. म्हणून मग वाट पाहावी लागते. अरे बाबा, हे सर्व कसे जमेल? म्हणजेच पान-बिन असे काहीच असता कामा नये. ही सर्व आसक्ती नव्हती तर मग ही वाढवली. जगण्यासाठी विष पितो. कशासाठी? जगण्यासाठी विष पितो. आणि हे विष त्या विषासारखे नाही, ते विष तर आत्ताच्या आत्ता संपवून टाकते, असे हे नाही, तर सौम्य विष! कसे? जिवंत राहतो, हळूहळू मरतो. (व्यंगात) मग हा मार्ग काय वाईट आहे? (!)

जेवण-बिवण वगैरे काही बाधक नाही. खीर खाल्ली तर ती बाधक नसते, पण जास्त खाल्ली तर मात्र बाधक होते. दुसरे काय बाधक असते? तर नशा-इनटॉक्सिकेशन! चहा, विडी, ब्रँडी वगैरे ह्या सर्व गोष्टी नशा आहेत. गांजा, भांग ह्या सर्व गोष्टी आत्म्यावर जास्त आवरण आणतात. चहा पण आवरण आणतो. पण चहा हे मंद पॉइजन (विष) आहे. खूप मंद. खूप वर्षे पीत असाल तर थोडे विष होते.

पण शेवटी ते विषच आहे ना! जिथे नशा तिथे विष. त्याहून अधिक विडी आहे. विडीत चहापेक्षा जास्त नशा आहे. ती मूळ आत्म्याला जाणूच देत नाही. आणि ब्रँडी तर माणसाच्या अनंत जन्मांचे वाटोळे करून टाकते. आणि गांजा आणि भांग तर शुद्धच उडवूनच टाकतात. त्याला आकाशात उडवतात आणि तो उडत राहतो. गांजा, भांग यांच्यापेक्षा ब्रँडी बरी. पण तरी हा सर्व कचरा मालच आहे, घुसला नाही तर उत्तम! यातील कोणत्याच गोष्टींना स्पर्श पण करता कामा नये. विडी-सिगारेटला स्पर्शच करू नये. या सर्व विषारी गोष्टी आहेत. त्या फक्त एका जन्माचेच नाही, तर अनंत जन्मांचे वाटोळे करतात. म्हणून शास्त्रकार म्हणतात की तंबाखूसारख्या सर्व वस्तूंना स्पर्श पण करू देऊ नका. आणि जर स्पर्श केलाच असेल तर लवकरात लवकर त्यापासून दूर व्हा. नाहीतर तुमचे अनंत जन्म खराब करून टाकतील. म्हणजे शास्त्रकारांनी सर्वात प्रथम मुक्ती कशापासून करवून घेतली? तर व्यसनांपासून!

[3.2] अल्कोहोलयुक्त पेये अत्यंत धोकादायक

स्वतःचाच भविष्यातील आनंदाचा हिस्सा आज बाहेर आणतात

प्रश्नकर्ता : व्यसनांपासून आनंद मिळतो, हे कितपत सत्य आहे?

दादाश्री : व्यसनात आनंद नसतोच. तुम्हाला कोणी सांगितले की व्यसनातून आनंद मिळतो?

प्रश्नकर्ता : दारू पिणे, मांस खाणे, सिगारेट ओढणे या सर्व गोष्टी भौतिक आनंद तर देतातच ना?

दादाश्री : यात आनंद कसा असू शकतो? तुम्ही तर स्वतःच्या आत्म्याला कमकुवत करून दारू पीत असता. आत्म्यात कमकुवतपणा घुसवून, आत्मा बेशुद्ध करता! याला आनंद कसे म्हणता येईल? यामुळे आनंद मिळतच नाही, उलट तुम्ही आनंद गमावता.

प्रश्नकर्ता : दारू प्याल्यानंतर दुःखांशी लढण्याची जणू काही शक्ती मिळाली आहे, असे वाटते!

दादाश्री : मी तुम्हाला सांगतो. दारू किंवा ही सर्व नशा आणणारा इनटॉक्सिकेटेड पेये आहेत ना, ती काय आहेत? तुमच्या आत ज्या शक्ती आहेत, पुढील आयुष्यसाठी जरूरी असणाऱ्या ज्या शक्ती आतमध्ये आहेत, त्या शक्तींना आज उचलून बाहेर आणतात. काय करतात? आतमध्ये जी शक्ती असते, जी दररोज वापरण्यासाठी असते ती एकाच दिवसात वापरून घालवतात. आणि त्यानंतर दहा दिवस त्याला हतबल करून टाकतात, संपवूनच टाकतात. दररोज आवश्यक असलेली जी शक्ती असते, ती व्यसनात एकाच दिवसात वापरून टाकतात. त्या दिवशी उल्हास वाटतो पण त्यानंतर ती व्यक्ती एकदम यूजलेस (निरूपयोगी) होते. दारूच्या नशेला उत्तेजना म्हणतात. नंतर ती उतरते आणि मग डिप्रेशन-निराशा देते. हा आनंद दारू देत नाही. पुढील आनंदाचा जो तुमचा हिस्सा आहे, त्यातूनच काही तो बाहेर काढतो आणि इनटॉक्सिकेट (धुंद) करतो. मग ती ब्रँडी असो, सिगारेट असो, तंबाखू असो किंवा हशीश (गांजा, भांग), इतर काहीही असो. ही नशा, काय आहे ते नीट समजून घ्यायला नको का? आपल्या आत जो आहे तोच ती बाहेर काढते. ती काही नवीन गोष्ट आणत नाही.

भान हरपणाऱ्या वस्तूंना आपण कसा स्पर्श करू शकतो?

ही नशा नंतर कोणते प्रत्याघाती परिणाम करते?

प्रश्नकर्ता : डोके दुखते.

दादाश्री : नाही, डोके दुखणे हा प्रत्याघाती परिणाम नाही. तू बेभान होशील. हे जे थोडेफार भान आहे ते पण नाहीसे होईल. पण अशी बेशुद्धी का करावी लागते?

प्रश्नकर्ता : चिंता कमी व्हावी म्हणून.

दादाश्री : चिंता कमी होते का? चिंतेसाठी वेगळा उपाय करायला हवा, असा उपाय करता कामा नये. दारू हा यावरील उपाय नाही. दारू कसली मदत करते? हा तर एक प्रकारचा साइकोलॉजिकल इफेक्ट (मानसिक परिणाम) आहे. हे लोक पिऊन मस्तीत फिरतात.

असल्या मस्तीचा काय उपयोग? असल्या मस्तीपेक्षा तर चिंता बरी! दारू जास्त प्यायला तर काय होईल?

प्रश्नकर्ता : तो अडखळत वेडा-वाकडा चालतो. हो, पूर्ण भानच नाहीसे होते.

दादाश्री : बेभान होऊन जातो. आत्मा बेभान होईल अशी कामे करूच नये.

प्रश्नकर्ता : पण आत्मा थोडाच बेभान होतो? तो तर सतत जागृतच असतो ना?

दादाश्री : मूळ आत्मा तर निरंतर जागृतच असतो पण हा जो व्यवहार आत्मा आहे, त्याला डलनेस (सुस्ती) येता कामा नये. अशी कारणे असता कामा नयेत. बेशुद्धी आणणाऱ्या गोष्टींना माणसाने स्पर्श पण करता कामा नये. जी गोष्ट आपली शुद्धी नाहीशी करते, अशा गोष्टींना आपण कसा स्पर्श करू शकतो? स्पर्शच करूच नये ना?

आपण जे जेवतो, त्याची एक-दीड तासात ब्रँडीच बनते आणि मग सुस्ती येते. मग आपण सर्व गोष्टी विसरून जातो. त्यावेळी जर त्याला निबंध लिहायला सांगितला तर तो लिहू शकत नाही. मग सुस्ती उतरल्यावर निबंध लिहू शकतो. म्हणजे ही सगळी ब्रँडीच आहे ना, आणखी त्यात ती पण ब्रँडी आत टाकली! आणि या सर्व गोष्टी तर आवरण आणणाऱ्या आहेत. आपले जेवण देखील आवरण आणणारेच आहे. पण त्याला पर्याय नाही, पण ज्याला पर्याय आहेत अशा गोष्टी घ्यायच्याच कशाला?

दारूचे आवरण दूर होत नाही आणि मग प्रगती खुंटते

प्रश्नकर्ता : दारूचा परिणाम आत्म्यावरून जात नाही का?

दादाश्री : कसा काय जाईल? तरी पण सवय लागलीच असेल तर मी मार्ग दाखवतो, दुसरे काय करणार? दारू म्हणजे तर मेंदूवर त्याचा परिणाम होतो, मेंदूत बदल होतात. त्यामुळे आत्म्यावर भ्रांतीची आवरणे येतात.

प्रश्नकर्ता : ती पिण्यामुळे मेंदूचे नुकसान कशा प्रकारे होते?

दादाश्री : तिच्यामुळे भान हरपते. त्यावेळी आत जागृतीवर आवरण येते. आणि मग ते आवरण कायम राहते, जातच नाही. तुम्हाला मनात असे वाटते की गेले, पण ते जात नाही. असे होत होत होत सर्व आवरणे येत येत येत मग मनुष्य जडासारखा होऊन जातो. मग त्याच्या मनात चांगले विचार येतच नाहीत. दारूच्या व्यसनामुळे प्रगती मंदावते, समजशक्ती कमी होते. त्याच्या आत आवरणे उत्पन्न होतात. ब्रँडी प्याल्यानंतर मग तुम्ही आवरणवाले होतात आणि मग संपूनच जातात. त्यांच्यावर नवीन आवरणे येतात. खूप सारी आवरणे येतात. ती सर्व अधोगतीत घेऊन जातात. म्हणजे जे प्रगत झाले आहेत त्यांचा मेंदू या दारूतून बाहेर पडल्यावर चांगला विकसित झालेला असतो. त्यांनी तो परत बिघडू देता कामा नये.

मनुष्यजन्मात बेभान होतो म्हणून मग जनावराचा जन्म मिळतो

लोक का पीत असतील? तर एकमेकांचे बघून बघून पितात. आणि दुसरे, जर एखादे बाहेरचे दु:ख असेल तर त्या दु:खाचा परिणाम होऊ नये म्हणून स्वत:ला बेभान करतात. असे बेभान होतात, मनुष्यजन्मात बेभान होतात म्हणून मग माणसाचा जन्म परत मिळत नाही, अधोगतीत जातात. म्हणजे पशुयोनीत जातात. पशुयोनीत बेभानपणा जास्त असतो ना! अर्थात मनुष्यजन्मात तर जसेजसे भान वाढते तशीतशी उर्ध्वगती होते.

दारू आणि मांसाहार यातून जे कर्ज होते, दारू आणि मांसाहार यातून जे सुख भोगतात, ते सुख रि-पे करण्यासाठी (फेडण्यासाठी) पशुयोनीत जावे लागते. हे जग म्हणजे काय सावळागोंधळ नाही. हे रि-पेवाले जग आहे. फक्त आंतरिक सुखच फेडावे लागत नाही, बाकी सर्व बाह्यसुखे फेडावी लागतात, तुम्हाला जेवढी रक्कम उधार घ्यायची असेल, तेवढी घ्या पण मग तेवढीच रक्कम परत करावी लागेल.

प्रश्नकर्ता : पुढच्या जन्मात जनावर होऊन परतफेड करावी

लागेल हे मान्य आहे पण त्याचे या जन्मात काय होईल? या जन्मात काय परिणाम होतील?

दादाश्री : या जन्मात पण त्याच्या स्वतःवर आवरणे येतात त्यामुळे तो जडासारखा, जनावरासारखाच झालेला असतो. माणूस मग जनावरासारखा होतो. जनावरात आणि त्याच्यात काही फरकच राहत नाही. कारण त्याची सगळी जागृती नष्ट होते. जसजशी जागृती वाढते तसतसा माणूस उत्तम बनत जातो. माणसाने जागृती वाढवायची असते, परंतु या गोष्टींमुळे तर जागृती उलट नष्ट होईल. म्हणून मग तो जनावर होईल. जनावर होण्याचे हे साधन आहे.

बेभानपणा कसा चालेल? माणूस बेभान झाला तर त्याचा काय उपयोग? म्हणून तर शास्त्रकार या लोकांच्या बाबतीत म्हणतात की हे जग उघड्या डोळ्यांनी झोपलेले आहे. का झोपते? कारण त्यांची जागृती फक्त घर आणि व्यापार, या दोनच ठिकाणी असते इतर कुठेही त्यांची जागृती नसते. व्यापारात, घरात खूप जागृती राखतात, पण परलोकात माझे काय होईल याबद्दल त्यांची जागृती नसते. म्हणजेच याप्रकारे झोपतात, वरून परत दारू पितात आणि मग आणखी जास्त झोपतात. दारू पितात म्हणजे दुसऱ्यांदा झोपले, दुप्पट केले. हा रोग तर गेला नाहीच, उलट आणखी नवीन रोग उत्पन्न केला.

झोपेतून जागे होण्याचा रस्ता या जगात कोणाकडेही नाही. उलट जागृतीतून झोपेत जायचा रस्ता आहे. दारू पितात आणि झोपेत शिरतात.

औषधात अल्कोहोल येते, तेव्हा काय करावे?

प्रश्नकर्ता : पण दादा, औषधात पण अल्कोहोल (दारू) असते ना? मग औषध घ्यायचे नाही का?

दादाश्री : औषध घ्यायचे, औषध घ्या. औषधात आले तर हरकत नाही. इथे तर लोक जाणूनबुजून, इच्छापूर्वक औषध नसताना मौज-मजा करण्यासाठी पितात. औषधात प्या. दारू आहे असे मानून

पिऊ नका. औषधात दारू आहे, त्याला हरकत नाही. अखेर तर तुम्ही त्याला औषध म्हणता ना? दारू म्हणत नाही ना?

प्रश्नकर्ता : नाही.

दादाश्री : तर मग हरकत नाही.

ती कधी मर्यादेबाहेर जाते ते सांगता येत नाही

तू ब्रँडी पितोस का? कधीतरी?

प्रश्नकर्ता : हो, कधीतरीच.

दादाश्री : हो, म्हणूनच मी म्हणतो की कधी कधी असे करता करता मग त्याची सवय लागते आणि मग व्यक्ती संपून जाते.

प्रश्नकर्ता : प्रमाणात प्यायली तर त्यात काय वाईट आहे?

दादाश्री : पण त्यात फायदा काय आहे? प्रमाणात पिऊन काय फायदा आहे? माणूस कायम प्रमाणात राहू शकत नाही. केव्हापर्यंत चांगला राहू शकतो? जोपर्यंत आयुष्य नियमित चालू असते तोपर्यंत प्रमाणात राहतो, आणि ते अनियमित होऊ लागते की जास्त पिऊ लागतो. नंतर मग तो आवाक्यात राहत नाही, आउट ऑफ कन्ट्रोल होऊन जातो. मी या सर्वांना पाहिले आहे. मग दारू आणि या सर्व गोष्टी कधी मर्यादापलीकडे जातील काहीच सांगता येत नाही. सिगारेट पण कधी मर्यादा तोडेल सांगता येत नाही. चहा पण तशीच गोष्ट आहे. पण फक्त चहाच्या बाबतीत मर्यादा ठेवता येते. पण सिगारेट मर्यादेत राहत नाही. समजा तुम्ही रोज चार सिगारेट ओढता. मग कधी कधी सहा ओढाल, आठ ओढाल, बारा पण ओढाल.

प्रश्नकर्ता : पण हे पिणे, हे सगळे मर्यादेत ठेवू शकू अशी शक्ती भगवंतांनी दिली आहे ना?

दादाश्री : मर्यादेत कधीपर्यंत ठेवू शकाल? जोपर्यंत आयुष्य नियमित आहे, तोपर्यंत. याउलट नैसर्गिकरीत्या कधी अनियमित होईल

ते सांगता येत नाही. व्यापारात उलट–सुलट होते, नुकसान होऊ लागते, तेव्हा त्यावेळी तो जास्त पिऊ लागतो आणि मग तो पूर्ण बिघडतो. माणूस स्वतः कसा ताबा ठेवू शकेल? एवढे सामर्थ्य असतेच कुठे त्या बिचाऱ्यांकडे? मर्यादेत राहील अशी ही गोष्टच नाही. कधी ना कधी परत त्या उलट्या रस्त्यावर चालू लागतो. एखादे दिवशी काळज्या वाढल्या की मग जास्त पितो. त्यानंतर मग तो कायम भरकटला जातो. म्हणून या गोष्टी स्पर्श करणाऱ्यासारख्या नाहीतच.

ज्ञानींची करुणापूर्वक विनंती 'दारूला घुसू देऊ नका'

तुम्ही दारू तर पिताच कामा नये. ही मजूर लोकांसाठी उपयोगी आहे. इतरांना जे करायचे असेल ते करू दे. तुम्ही मात्र तिला स्पर्श करता कामा नये. दारू प्यायल्याने मग तुम्हीच तिच्यात अडकता, आणि अडकल्यावर मग तुम्हाला सुटता येणार नाही. आणि मी पाहिले आहे की नंतर लोक खूप दुःखी होतात. मग सुटू शकत नाहीत, त्यामुळे बिचारे खूप दुःखी होतात. म्हणून मी तर तुम्हाला लाल झेंडा दाखवितो. अजूनही जोपर्यंत सवय लागलेली नाही, तोपर्यंतच त्यातून सुटा. म्हणजेच ही दारूची सवय किंवा अशा इतर गोष्टींना घुसूच देऊ नका. मी तर तुम्हाला विनंती करतो की, बाबा रे, हिला घुसूच देऊ नका, नाहीतर मग अडकल्यावर तुम्हाला बाहेर पडता येणार नाही. आमच्या आज्ञांचे जरी पालन नाही केले तरी पण आमची एवढी विनंती मात्र मान्य करा. विनंती मान्य करायला काही हरकत आहे का चंदुभाई? (चंदुभाईच्या जागी वाचकांनी आपले नाव समजावे) विनंती मान्य कराल ना?

प्रश्नकर्ता : हो, हो.

आर्यप्रजेला दारू शोभत नाही, ती तुम्हाला अडाणी बनवते

दादाश्री : परदेशी लोक दारू पिओत, मांसाहार करोत, काहीही करोत, त्यांच्यासाठी हरकत नाही. भारतीयांसाठी हरकत आहे. जे पुनर्जन्म मानतात, त्यांच्यावर जबाबदारी आहे. जे पुनर्जन्म मानतच नाहीत, त्यांना कसली जबाबदारी? ह्या लहान मुलांनी, बालमंदिराच्या

मुलांनी कप फोडले तर त्यांची जबाबदारी नाही, पण समजदार माणसांनी फोडले तर त्यांची जबाबदारी आहे. म्हणजेच ही सर्व लहान मुलेच आहेत, त्यांना सगळी सूट आहे. भारतीयांना सूट नाही. कारण आपण पुर्नजन्म मानतो. हे कर्म मी केले, म्हणून माझी जबाबदारी आहे, असे आपण मानतो. मानतो की नाही?

प्रश्नकर्ता : जवळजवळ सर्वच मानतात.

दादाश्री : म्हणजेच ते जे करतात, तसे आपण करता कामा नये. तुम्ही व्होल ॲन सोल रिस्पोन्सिबल (पूर्णपणे जबाबदार) आहात आणि ते लोक अजिबात जबाबदार नाहीत. शिवाय तुमची जागृती खूप वाढलेली आहे. त्या बिचाऱ्यांना तर या आतील गोष्टींबद्दल जागृतीच नाही. बाहेरच्या सर्व गोष्टींबद्दल त्यांना उत्तम जागृती आहे. आंतरिक जागृती अजिबात नाही.

आपण आर्यप्रजा आहोत, आपले रक्त भारतीय आहे. अडाणीपणा तर येताच कामा नाही ना? आपण आर्यप्रजा आहोत आणि आर्यप्रजेला या गोष्टी शोभत नाहीत. आपण आर्यप्रजा आहोत की नाहीत? मात्र सध्या अडाण्यांसारखे झालो आहोत. परंतु मुळात आपण आर्य आहोत, आणि आपण आर्य सुधारू शकू असे आहोत. म्हणजेच आपले मूळ गुण खूप चांगले आहेत. पण होते काय? आपण कुठेही फिरायला जातो, मग आपले संस्कार बिघडतात. मग आपण दारू प्यायला लागतो, इतर काही गोष्टी करू लागतो. हे आपल्याला शोभत नाही.

मुसलमान लोकांना पण हे समजले आहे, मग आपण का समजू नये?

प्रश्नकर्ता : त्यांना कसे समजते, दादा? ह्या गोष्टी मुसलमानांना कशा समजल्या?

दादाश्री : त्यांच्यातील अवलियांनी हा शोध घेतला होता. ती व्यक्ती नंतर वेडी होते. मुसलमान दारूच्या इतके विरोधी असतात की अस्सल मुसलमान तर इथे दारूचा थेंब पडला असेल तर तेवढी चामडी जाळून टाकतो. म्हणजे काही तरी असेल म्हणूनच ना?

अध्यात्म मार्गाने जाणाऱ्यांना अशी लफडी नसतात

दारू, मांसाहार यांना कधीही स्पर्श करू नका. सायंटिफिकरीत्या (वैज्ञानिकरीत्या) पाहिले तर यात खूपच भयंकर नुकसान आहे.

प्रश्नकर्ता : हे वैज्ञानिक कसे आहे?

दादाश्री : परत याची पद्धत शोधत आहात? तशी तर चार पाय येण्याची तयारी सुरू आहे आणि परत पद्धत शोधत आहात?

प्रश्नकर्ता : हे जरा समजावून सांगाल तर जास्त नीट समजेल.

दादाश्री : किती समजावून सांगायचे? एकदम असारच आहे. एक तर यामुळे किती तरी जीव मरतात, आणि दुसरे म्हणजे स्वतःला बेहोशी येते. दारू-वाइन बनवताना खूप जीवजंतू मरतात. बनवताना फरमेंटेशनमुळे जे जीव उत्पन्न होतात, ते खूप जीव मरून जातात. दारू म्हणजे चालत्या-फिरत्या त्रस जीवांचाच रस आहे. निव्वळ जीवांचाच रस आहे! दारूच्या एका परमाणूत इतके अधिक जंतू आहेत की ते ज्ञानीला सुद्धा अज्ञानी करतात. यात खूप अधिक जंतू असतात. दारू धर्माला बरबाद करून टाकते.

प्रश्नकर्ता : प्रत्येक वस्तूत नुकसान तर आहेच, पण कमी-जास्त प्रमाणात.

दादाश्री : प्रत्येक वस्तूत नुकसान पण असते आणि फायदा पण असतो. प्रत्येक वस्तूत नेहमी फक्त नुकसान नसते. पण ह्यात तर अध्यात्मिक नुकसान आहे, म्हणून आम्ही मनाई करतो. भौतिकमध्ये फायदा होत असेल, तरी पण आपल्याला त्याची गरज नाही. आपण अध्यात्माच्या रस्त्यावर चालले पाहिजे. आपण भारतीय आहोत, म्हणून आपला अध्यात्म मार्ग असायला हवा आणि शांतीमय मार्ग असायला हवा. अशांती आपण सहन करू शकत नाही. आणि या अध्यात्म मार्गावर चालणाऱ्यांना अशी लफडी नसतातच. एक तर हा मांसाहार आणि दुसरी दारू, दोन्ही बंद झाले तरी खूप झाले. ह्या भगवंताच्या नियमांच्या बाहेरील गोष्टी आहेत.

दारू तर नाहीच, पण वाइन पण पिऊ शकत नाही

प्रश्नकर्ता : आम्ही दारू पीत नाही. पण ही वाइन प्यायली तर चालणार नाही का?

दादाश्री : काहीच चालणार नाही.

प्रश्नकर्ता : तर मग वाइनमध्ये काय नुकसान आहे? ती तर आपल्या द्राक्षासवासारखी (द्राक्षांच्या रसासारखी) आहे.

दादाश्री : ॲपल ज्यूस (सफरचंदाचा रस) प्या.

प्रश्नकर्ता : बरोबर आहे. पण तुम्ही काल म्हणाला होतात की वाइन पिण्यात खूप सूक्ष्म जीवांची हिंसा होते. तर मग आपण हे गहू खातो, ते गहू जे पेरतात. तेव्हा जमिनीत किती अधिक जीवजंतू असतात. औषधे मारावी लागतात, तेव्हा किती हिंसा होते?

दादाश्री : पण त्याला पर्याय नाही ना? जेवणाशिवाय आपले कसे चालेल? जेवण तर हवेच ना? ते नाईलाजाने करावेच लागते, अनिवार्य म्हणून करावे लागते. आणि हे (मद्यपान) तर लोक शौक म्हणून करतात.

प्रश्नकर्ता : ही वाइन कधीतरीच, एखाद्या प्रसंगानुसार थोडी घेतली तर त्यात काय वाईट आहे?

दादाश्री : वर्षातून कितीवेळा तुम्ही चोरी करता? एखाद्याच्या खिशांतून पैसे किती वेळा चोरता?

प्रश्नकर्ता : नाही, कधीच नाही. कोणाच्या खिशातून असे कधीच नाही.

दादाश्री : पण एखाद्या दिवशी असे पैसे चोरले तर त्यात काय चूक आहे?

प्रश्नकर्ता : हो, चूक आहे. त्याला चूक म्हणतात.

बीअरचा बांध फुटला तर तो दारूपर्यंत पोहोचतो

प्रश्नकर्ता : मी तर बीअर घेतो. वाइन-ब्रँडी पीत नाही. कधीतरी बीअर घेतो.

दादाश्री : ओहोहो! त्याने काय फायदा होतो? त्यामुळे शक्ती वाढते का? तर मग कोणता फायदा होतो? त्याऐवजी पाणी प्यायलो तर काय चूक आहे? इतर खूप गोष्टी पिण्यासारख्या आहेत.

प्रश्नकर्ता : पण दादा, भारतात चार-पाच लोक एकत्र येऊन पान खातात, तसेच आम्ही बीअर पितो. ते पानापेक्षा जास्त आरोग्यकारक आहे. भारतात जसे पान खातात, तसेच इथे बीअर पितात. तर दादा, बिअरमध्ये कसला धोका आहे?

दादाश्री : पण फायदा काय आहे? गरज काय आहे? दारूत जास्त बेशुद्धपणा असतो आणि बीअरमध्ये कमी असतो. बीअरमध्ये त्याला धुंदी (मस्ती) वाटत राहते. बीअर पिण्यामुळे बांध फुटतो. बांध फुटला की मग तो कधी कधी ती (ब्रँडी) पण पिऊ लागतो म्हणजेच बांध फुटता कामा नये आणि जर एक्सटेंशन मिळाले तर ब्रँडी पण प्या! जर (आयुष्याचे) दोनशे-तीनशे वर्षांचे एक्सटेंशन मिळत असेल तर अशी पेये पण प्या! पण इथून तर निघूनच जायचे आहे, एक्सटेंशन मिळत नसेल, तर मग असे का करायचे?

निराग्रहीपणे सावध करतात, सेफसाईड कुठे आहे?

सार-असार याचा काही विवेक करा. विवेक असतो की नसतो? काय खावे, काय खाऊ नये? माणसात असा विवेक असतो की नाही? काय खावे, काय खाऊ नये, काय प्यावे, काय पिऊ नये (हे समजणे) त्याला विवेक म्हणतात. ज्याला विवेक नाही त्याला माणूसच म्हणू शकत नाही ना! सारासार याचा विवेक, सार आणि असार. असा विवेक नको का? काय वाटते तुम्हाला?

प्रश्नकर्ता : हो, हो, हवा ना!

दादाश्री : मग हे सर्व विवेकात मोडत नाही का! प्यायची असेल तर प्या. आम्ही सल्ला देतो. आम्ही काही तुम्हाला रागावणार नाही किंवा जबरदस्तीही करणार नाही. जर सुखी व्हायचे असेल तर या गोष्टींपासून दूर राहणेच चांगले. नाहीतर आम्ही तुम्हाला मनाई करत नाही. प्या किंवा पिऊ नका असे मी तुम्हाला सांगू इच्छित नाही. मी तुम्हाला एवढेच सांगतो की यात सेफसाईड (सुरक्षितता) काय आहे, आणि फायदा काय आहे. तुम्हाला समजत आहे ना? तुम्हाला ठीक वाटेल ते तुम्ही करा. माझी त्याला काहीच हरकत नाही. पण तुम्हाला समजावण्यासाठी सांगत आहे. अजूनही तुम्हाला व्हायचे असेल तर सावध व्हा. ज्ञानी पुरुषांच्या सांगण्यावरून सावध झालात तर चांगलेच. सावध झाला नाही तर मी तुम्हाला जबरदस्ती करणार नाही. मी तुम्हाला दारू पिण्याची मनाई करतो, कारण हे अडाणी लोकांचे काम आहे, समजदार लोक व्यसन करत नाहीत.

[3.3] व्यसनींचा सहवास म्हणजे खूप मोठा धोका

खोटे बोलूनही दारूच्या पकडीतून सुटून जा

प्रश्नकर्ता : दुसरे आम्हाला असे विचारायचे आहे की इथे अमेरिकेत जर आम्ही एखाद्या पार्टीला गेलो आणि तिथे जर कोणी आग्रहपूर्वक म्हणाले की तुम्ही व्हिस्की प्या, व्हिस्की प्या, तर अशावेळी आम्ही काय करावे?

दादाश्री : नको...

प्रश्नकर्ता : जर आम्ही नको म्हटले आणि त्यांनी चार-चार वेळा सांगितले तर मग आम्ही करतो ते चुकीचे होईल ना? हा आमचा आग्रह नाही का?

दादाश्री : नाही, नाही नाही. तिथे एकच गोष्ट सांगायची की 'याने माझ्या शरीराचे खूप नुकसान होते, म्हणून डॉक्टरांनी मला पूर्ण मनाई केली आहे.' असे सांगितले तर सुटाल.

प्रश्नकर्ता : आत्म्यासाठी खोटे बोलावे का?

दादाश्री : आत्म्यासाठी खोटे बोलायला काहीच हरकत नाही. 'मी धार्मिक आहे' असे म्हणू नका. त्यांना असे सांगा की 'माझ्या शरीराला सोसत नाही. डॉक्टरांनी एक थेंब पण घेऊ नका अशी सक्त मनाई केली आहे. आता तुमचे शरीर हे सहन करील एवढे सशक्त नाही.' असे सांगितले तर ते ऐकतील. काहीतरी मार्ग शोधून काढा. अशा अडचणीत सापडलात तर कोणत्या तरी मार्गाने सुटून जा. ज्याला स्वतःला पिण्याची इच्छा नाही, त्याला सर्व रस्ते सापडतात. पण ज्याला प्यायचीच आहे त्याला रस्ता सापडत नाही. स्वतःचीच इच्छा गैरमार्गाने जाण्याची असेल तर मग त्याला रस्ता सापडत नाही.

व्यसनरूपी आगीजवळ जाऊच नये

असे मित्र मिळाले आहेत का?

प्रश्नकर्ता : कॉलेजात असे काही मित्र आहेत, जे पितात.

दादाश्री : ते पितात मग तुझ्या मनात, ''चला मी पण एकदा चव पाहतो'', असा विचार नाही आला?

प्रश्नकर्ता : नाही, अजूनपर्यंत नाही आला.

दादाश्री : आणि येईल तेव्हा काय करशील?

प्रश्नकर्ता : तेव्हा मी तो (विचार) थांबवण्याचा प्रयत्न करीन.

दादाश्री : आगीजवळ न जाणे चांगले की आगीजवळ जाऊन मग स्वतःला थांबवण्याचा प्रयत्न करणे चांगले?

प्रश्नकर्ता : स्वतःला थांबवण्याचा प्रयत्न करणे चांगले.

दादाश्री : नाही, आगीजवळ जायचेच नाही.

प्रश्नकर्ता : मग मित्र निघून जातील.

दादाश्री : नाही, नाही, मैत्री टेस्टेड असावी. अनटेस्टेड मैत्री ठेवून काय करायचे आहे? जे प्रत्यक्ष अडचणीच्यावेळी मदतीला उभे राहतील असे मित्र हवेत.

प्रश्नकर्ता : माझे दोन-चार मित्र असे आहेत की ज्यांना दारू सोडायची आहे, पण सुटत नाही. त्यांना कसे सोडवू शकतो?

दादाश्री : सोडवण्याबद्दल तर तू बोलूच नकोस. त्यांना सोडवायला जाताना स्वत: कसे अडकणार नाही त्याची प्रथम काळजी घे. कारण जे असे सोडवायला गेले होते, तेच अधिक अडकले होते. अशा लोकांच्या संपर्कातही येता कामा नये, दूरच राहायला हवे. नाहीतर एक दिवस ते सगळे एकत्र येऊन, तुला पकडून, संगनमत करून तुला पाजतील.

‘व्यसनीपासून दूर राहावे’ असे आपल्या ज्ञानात असले पाहिजे

जे कुसंगी असतात ना, अशा मुलांबरोबर मैत्रीच करू नये. नाहीतर कुसंगाचा परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. कुसंगाचा स्वभावच तसा आहे, त्याचा परिणाम होतोच. चांगले संस्कार रुजायला मात्र वेळ लागतो.

प्रश्नकर्ता : हे तुमचे म्हणणे बरोबर आहे दादा, पण लहानपणापासून असलेले चांगले मित्र, जर विडी किंवा सिगारेट अशी व्यसने करत असतील, तर अशावेळी काय करावे?

दादाश्री : जमेल तेवढे दूर रहा. तरी पण असे दूर राहणे ही आपल्या हातातील गोष्ट नाही. तसा अधिकार तुमच्या हातात नाही की तुम्ही तसे करू शकालच. पण ज्ञानात काय हवे? की व्यसनी लोकांपासून दूर रहा. मग जर निसर्गाने तुम्हाला त्यांच्या संगतीत ठेवले तर इट्स ए डिफरंट मॅटर (ती वेगळी गोष्ट आहे). पण आपल्या ज्ञानात व्यसनींपासून दूर रहा, असे असायलाच हवे.

प्रश्नकर्ता : हो, हो पण समजा, अशांच्या सोबत राहण्याचा योग आला तर व्यसनापासून मुक्त कसे राहावे?

दादाश्री : व्यसनापासून मुक्त राहण्यासाठी ‘व्यसन ही चुकीची

गोष्ट आहे' अशी प्रतीती तुम्हाला व्हायला हवी. ती प्रतीती ढळता कामा नये. तुमचा निश्चय डळमळता कामा नये. तर मग ती व्यक्ती व्यसनापासून दूर राहू शकते. पण 'याला काही हरकत नाही' असे म्हटले, तर ते घुसलेच.

[4] व्यसनांपासून सुटू शकतो का?

स्वतः निश्चय केला तर सुटू शकतो

प्रश्नकर्ता : कित्येक जण ह्या दारूच्या वाईट सवयीत अडकले आहेत. ते असे म्हणतात की 'आम्हाला दारू सोडायची आहे पण सुटत नाही.'

दादाश्री : खूप काळ यात गेला की त्यानंतर ती सुटत नाही. तरीही ज्याला सोडायची असेल त्याने निश्चय केला तर एक ना एक दिवस सुटेल. स्वतः निश्चय केला तरच जमू शकते, नाहीतर सुटू शकत नाही. आता इतर मार्ग राहिला नाही.

प्रश्नकर्ता : स्वतः निश्चय केला तर होऊ शकते, पण या जन्मात निश्चय केला तर पुढील जन्मात होईल ना? या जन्मात तर मागच्या जन्माचे सगळे चालले आहे ना?

दादाश्री : हो, नक्कीच. पण असा निश्चय केला तर तो निश्चय मागील जन्माच्या आधारामुळे जास्त मजबूत होतो. आणि म्हणून या जन्मातही त्याला मदत मिळत राहते आणि पुढच्या जन्मात तर खूपच मदत मिळेल.

प्रश्नकर्ता : बरोबर.

दादाश्री : आता, ही गाडी चालवायची आहे, तर यात हे स्टिअरिंग म्हणजे निश्चय. हे स्टिअरिंग म्हणजे पण एका प्रकारचा निश्चयच आहे. रस्त्याबाहेर जाता कामा नये असा निश्चय. आणि ज्याचा निश्चय राहू शकत नाही, त्याला तर प्रतिज्ञेचे पालन करावे लागते. प्रतिज्ञा घ्यावी लागते. आणि ती प्रतिज्ञा आमच्याकडून घेतली तर काम होते.

मनापासून पश्चात्ताप हवा आणि कोणी सुधारणारा हवा

दुसरे, आता ही सवय कशी जाईल? तर जर एक व्यक्ती पीत असेल तर त्याची त्याला खूप चीड येते, तेव्हा म्हणतो 'ही दारू पिता कामा नये, पिता कामा नये, बघा तरी, दारू पिऊन ह्याची काय अवस्था झाली आहे.' असे म्हणता म्हणता एक दिवस तो (चिडणारा) स्वतः पिऊ शकणार नाही. त्याची ती मूळ गाठ संपेल.

प्रश्नकर्ता : म्हणजे जर कोणी पीत असेल तर 'ते वाईट आहे' असे म्हटल्याने आपली दारू सुटते.

दादाश्री : हो, असे करत करत स्वत:ची गाठ संपते.

प्रश्नकर्ता : सगळे जण विडी ओढणे वाईट आहे, मांसाहारी होणे वाईट आहे असे मानतात, आणि तरीही ते असे सर्व करतच राहतात. कर्मांना जाणत असून सुद्धा कर्मे करतच राहतात.

दादाश्री : हे सर्व बोलतात पण ते सर्व वरवरचे असते. सुपरफ्युअस बोलतात. कसे? मनापासून बोलत नाहीत. जर मनापासून बोलले तर मग काही काळानंतर हे व्यसन सुटण्याला पर्यायच नाही. मन:पूर्वक असेल तर त्याला जावेच लागेल. तुमचा एखादा दोष असेल पुष्कळ वाईट दोष असेल, आणि त्या दोषाबद्दल तुम्ही खूप पश्चात्ताप केला, तरी पण परत दुसऱ्या दिवशी तो दोष होतो. तर दोष होतो त्याला हरकत नाही, पण तुम्ही खूप पश्चात्ताप करत राहा.

प्रश्नकर्ता : हं... म्हणजे व्यक्ती सुधारू शकते असा संभव आहे?

दादाश्री : निश्चित संभव आहे, पण सुधारणारा हवा.

शब्दज्ञानाने नाही, नीट समजेल अशा ज्ञानामुळे सुटता येते

प्रश्नकर्ता : प्रवचनकारांकडून अशा गोष्टी ऐकतो, तेव्हा सर्व काही नीट चालते, पण थोड्या दिवसानंतर सर्व निघून जाते.

दादाश्री : हे चुकीचे आहे. जे ऐकल्यावर सर्व काही नीट चालते आणि थोड्या दिवसानंतर निघून जाते याला काही अर्थच नाही ना! हा तर सिनेमा झाला. चालू असताना दिसतो आणि मग निघून जातो, याला सिनेमा म्हणतात. म्हणूनच मी टिकून राहील असे देईन! खूप लोकांचा दारू आणि मांसाहार हे सर्व सुटले आहे, आपोआपच फक्त माझ्या शब्दांनीच! माझ्या शब्दांनी लोक पूर्ण बदलून जातात. हे वचनबल इतके चांगले आहे की सर्व पूर्णपणे बदलतात! हे लोक, जे इथे उपदेश द्यायला येतात ते सगळे दोन-पाच दिवस एकांतिक उपदेश देऊन निघून जातात. पण 'ज्ञान' शब्दाने चालणार नाही. 'विडी ओढू नका, इतर व्यसने करू नका' असे बोलून चालणार नाही, याला ज्ञान म्हणत नाहीत. ज्ञान तर त्यांना समजले पाहिजे. स्पष्टपणे समजले पाहिजे.

आता जाणणे आणि करणे (क्रिया) एकच कधी होतात? शुष्क ज्ञान नसेल आणि सत् ज्ञान असेल, तर होतात. म्हणजेच खरे ज्ञान असेल तर ज्ञान आणि क्रिया, दोन्ही एकत्रच होतात. खरे ज्ञान! म्हणजेच खरे ज्ञान प्राप्त झालेलेच नाही. नाहीतर आपल्यानुसार सर्व होतच राहते. आपल्याकडे तर ज्ञान आणि क्रिया दोन्ही बरोबरच होतात. म्हणजेच चुस्त ज्ञान हवे, कसे? शुष्क ज्ञान नको. शुष्क ज्ञान म्हणजे काय? पाहा ना, ज्ञान तर सिगारेटच्या पाकिटावर लिहिलेले असते ना?

प्रश्नकर्ता : हो, लिहिलेले असते.

दादाश्री : ज्ञान सरकारने प्रकाशित केले आहे. सरकार म्हणते सिगारेटच्या पाकिटावर लिहा आणि लोक पाकिटावरचे वाचून पण सिगारेट ओढत राहतात. म्हणजेच ज्ञान अशा तऱ्हेने द्यायला हवे की त्यामुळे त्याच्या मनात हे निश्चित व्हायला हवे की 'मी आता याला स्पर्श पण करणार नाही.' पण लोकांनी तर शुष्क ज्ञानच जाणले आहे.

ज्ञानींच्या चारित्र्यबलामुळे व्यसन सहज सुटते

प्रश्नकर्ता : मी असे ऐकले आहे की तुम्ही जेव्हा अमेरिकेला गेला होतात तेव्हा तुम्ही तेथील खूप लोकांना व्यसनांतून आणि (वाईट)

सवयीतून सोडवले होते. ते कसे मुक्त झाले? तुम्ही हे कसे करवून घेता? काय उपदेश देता?

दादाश्री : माझे चारित्र्यबळ आहे! कारण जेवढे ज्याचे शील आणि चारित्र्य, तेवढे त्याचे बळ! कम्पलीट मोरॉलिटी, कम्पलीट सिन्सियारिटी (पूर्ण नैतिकता, पूर्ण निष्ठा) याला चारित्र्य म्हणतात. कम्पलीट मोरॉलिटी, एक परसेंट पण कमी नाही, पूर्ण सिन्सियारिटी, एक परसेंट पण कमी नाही, त्याला चारित्र्य म्हणतात! असे चारित्र्य असते, तिथे सर्व त्यांच्या म्हणण्यानुसार होते.

[5] व्यसनांपासून सुटण्याचे प्राथमिक उपाय

[5.1] दारूच्या व्यसनांपासून सुटण्याचे उपाय

मोठ्या व्यसनापासून छोट्या व्यसनात येणे

प्रश्नकर्ता : दादा, मी सिगारेट खूप ओढतो.

दादाश्री : आणि काय पिता?

प्रश्नकर्ता : कधी कधी दारू पितो.

दादाश्री : आणि सिगारेट?

प्रश्नकर्ता : सिगारेट जास्त ओढतो.

दादाश्री : हे असेच कधी कधी करत सिगारेट घुसली आहे. म्हणून हिला स्पर्शही करता कामा नये. दारू आणि सिगारेट दोन्ही स्पर्श करण्यायोग्य गोष्टी नाहीत. तरी पण ही सिगारेट, वगैरे सर्व तर ठीक आहे, पण ही दारू मात्र असताच कामा नये. फक्त एका दारूची संगत अजिबात करता कामा नये. संगत झाली असेल तर मैत्री सोडून दिली पाहिजे. त्याऐवजी तुम्ही एखादी दुसरी संगत करा. दुसरे काही नाही तर पान खायला सुरू करा. थोडीशी नशा येईल अशी सुपारी पण मिळते. जेवणानंतर खाल्ली तर मेंदूला तरतरी येते असे वाटते, अशी सुपारी मिळते. असे काही तरी केले तर हरकत नाही. आणि ही सिगारेट

पण एवढी वाईट नाही. मन जर जास्त बैचेन झाले असेल, तर मनाला खुश करण्यासाठी एखादी सिगारेट ओढा. मनाची बैचेनी संपली की मग झाले. इतर सर्व व्यसने इतकी जास्त वाईट नाहीत, तरी पण कोणतेही व्यसन शेवटी चुकीचे तर आहेच. तरीही मोठ्या व्यसनाऐवजी छोटे व्यसन ठेवणे बरे आहे. मोठे व्यसन लागले असेल तर लहान व्यसनावर या. आणि मनाला सांगा की 'बाबा रे, हे घे'. पण ही दारू वगैरे तर नकोच. हा तर वेडेपणा आहे. ती आत्म्याला बेहोश करते, अशी औषधे तर आपल्याला शोभत नाहीत ना!

सिगारेट बेहोश करत नाही पण इनटॉक्सिकेशन करते. मनाला चंचल बनवते. पण शरीरासाठी खूप नुकसानकारक आहे. हा चहा पण मनाला चंचल करतो. बेहोश करत नाही पण मनाला चंचल करतो. चहा पण चांगला नाही आणि दुसरे काय तर चहा आपल्याला परवश करतो, चहा पण परवश करतो पण त्यामुळे भान जात नाही. चहामुळे भान जाऊ शकते का? आणि दारू जर एक दिवस जास्त चढली तर? अरे! लोक घरात बसवून त्याच्याकडून सह्यासुद्धा करवून घेतात! दारू पाजत जातात आणि सह्या घेत जातात. आणि तो पण सगळ्या ठिकाणी सह्या करतो. याउलट हुक्का ओढणारे, सिगारेट ओढणारे यांचे भान जात नाही.

प्रश्नकर्ता : जे तंबाखू खातात, सिगारेट ओढतात तर त्यांच्यावरही असाच परिणाम होतो का?

दादाश्री : सिगारेटचा परिणाम वेगळ्या प्रकारे होतो. त्यात याप्रमाणे शक्ती (एकदम) संपत नाही, पण त्याने आतमध्ये कॅन्सर होतो, दुसरे, तिसरे काही ना काही आजार होतात. आजारांची कारणे ठेवली जातातच. आणि तुम्ही ज्या प्रमाणात ओढता त्याप्रमाणात तर नुकसान करतेच.

प्रश्नकर्ता : कॅन्सर झाला तर आपण कॅन्सल होतो ना? संपतो ना?

दादाश्री : हो, तो धोका तर आहेच. पण या दारूचा धोका तर

खूपच जास्त आहे. दारू म्हणजे तर रोजचा कॅन्सर आहे, दररोजचा कॅन्सर! भानच हरवतो ना!

आपल्याकडे तर पिण्यायोग्य कितीतरी गोष्टी आहेत! ओहोहोहो, इतक्या साऱ्या गोष्टी! कितीतरी प्रकारचे रस आहेत आणि चहा वगैरे, धमालच आहे नाही का? खूप प्रकारची पेये आहेत. सोडा प्यायला काय हरकत आहे? अरे, विम्टो (सॉफ्ट ड्रिंक) मिळते, ते पण प्यायला काय हरकत आहे? हे पेप्सी-विप्सी प्या, असे खूपच प्रकारचे रस आहेत! किती छान आहेत! दुधात बदाम घालून आरामात प्या! इथे संधी मिळाली आहे, बदाम स्वस्त आहेत. सर्व स्वस्त आहे. हे सर्व तर पीत नाहीत आणि ही दारू शोधून काढली आहे! लोक जे आहे ते सुख उपभोगत नाहीत आणि नाही त्या सुखाला शोधत राहतात.

आत्मज्ञान घेणे हा सुटण्याचा सर्वात सोपामार्ग

प्रश्नकर्ता : दारूच्या व्यसनातून सुटण्याचा सर्वात सोपा मार्ग कोणता?

दादाश्री : मला अमेरिकेत एक व्यक्ती भेटली होती. ती व्यक्ती तर दररोज एक गॅलन दारू पीत असे. त्याला हे ज्ञान दिले आणि त्याची दारू एकदम बंद झाली! ज्ञान दिले आणि एकदम बंद. 'या दादांनी माझ्यावर असे काय केले की पूर्ण एक गॅलन दारू सुटली.' असे तो म्हणतो! हे अक्रम विज्ञान आहे. आम्ही ह्या सर्वांना ज्ञान दिले त्यानंतर बऱ्याच लोकांची दारू सुटली. पापकर्मच नष्ट झाले. मला तर दारू पिणारे बरेच लोक भेटलेले, पण मला भेटल्यानंतर त्या सर्वांची दारू सुटली.

प्रश्नकर्ता : अशी सुटू शकते का? ज्ञानी भेटल्यानंतर सुटू शकते?

दादाश्री : हो, सर्व काही सुटते. ज्ञानींची भेट झाल्यावर या जगात काय सुटत नाही? आणि मी तर तुम्हाला सर्व सुखे द्यायला

तयार आहे. कधीच दु:ख उत्पन्न होणार नाही असे सुख तुम्हाला दिले तर तुम्ही सोडाल की नाही? हे सारे सुख मी तुम्हाला कायम स्वरूपी देतो. पण जरा दोन-तीन महिने (व्यसने) सोडा ना, पंधरा दिवस महिनाभर सोडा ना, अशी भूमिका तयार व्हावी यासाठी सोडा.

प्रश्नकर्ता : हो सोडेन, असे तर करू शकतो.

दादाश्री : हो, तुम्ही पंधरा दिवस सोडा ना! त्यानंतर जर तुम्हाला असे वाटले की दादाजी, हे तुम्हाला दिले (हे सोडले), आणि नंतर जर तुम्हाला संतोषकारक वाटले नाही तर मग परत घ्या. यात तुमचे काय नुकसान आहे? या करारामुळे मी तुम्हाला थोडेच (कायमचे) बांधले आहे? पण फक्त पंधरा दिवस तरी सोडा.

खूप व्यापारी मला म्हणतात, 'दादा, थोडी थोडी घेतो', मी म्हणतो 'अरे, हे तुम्हाला शोभत नाही.'

प्रश्नकर्ता : पण जवळजवळ सर्वांनीच सोडली आहे, दादा! हे ज्ञान मिळाल्यावर आपोआप सुटते.

दादाश्री : हो, आता सोडतात. दारू आणि मांसाहार दोन्ही सोडतात. खूप लोकांनी सोडली आहे. मला वचन दिले आहे, दादाजी मी आता पिणार नाही. लोक दु:खामुळेच यात पडतात, आतमध्ये शांती नसते, म्हणून. आता जरी दादांची आठवण राहिली तरी किती चांगले! 'दादा' असे म्हटल्याबरोबरच शांती वाटते. 'दादा' शब्द रेडिएट्स! काय होते?

प्रश्नकर्ता : हो, वर्ड 'दादा' रेडिएट्स! ('दादा' शब्दच काम करतो)

सुटल्यानंतरही 'चांगली आहे' असे बोलता कामा नये

प्रश्नकर्ता : ही दारू प्याल्यामुळे हे जे सगळे मेंदूचे नुकसान झाले आहे, मेंदूच्या परमाणूंचे जे नुकसान झाले आहे. ते कसे भरून निघणार?

दादाश्री : त्याला काहीच मार्ग नाही. जसाजसा वेळ जाईल तसेतसे हे होत जाईल. प्याल्याशिवाय जसाजसा वेळ जात जाईल, तसेतसे परमाणूंचे नुकसान भरून निघेल. एकदम होणार नाही. पिणे बंद केले आहे ना? मग आता यासाठी काय करायचे? तर 'दारू पिणे खराब आहे' असे सतत बोलत राहायचे.

प्रश्नकर्ता : अच्छा, बंद केल्यानंतरही बोलायचे आहे?

दादाश्री : नंतरही बोलायचे आहे. 'चांगली आहे' असे तर कधीच बोलू नका. नाहीतर त्याचा परिणाम परत होईल. चांगली आहे, असे कधीच मानू नका.

[5.2] इतर व्यसनांतून सुटण्याचे उपाय

व्यसन सोडण्यासाठी शक्ती मागा आणि भावना बदला

प्रश्नकर्ता : सिगारेट सोडण्यासाठी काय करावे?

दादाश्री : सिगारेट ओढता हे पूर्वजन्मीच्या आधारावर आहे, पण तुम्ही मनात भाव करावे की ही ओढता कामा नये. सिगारेट ओढली, ती पूर्वजन्माच्या आधारावर. तुम्हाला ओढायची नसते तरी पण योग असे येतात की तुम्ही ओढता. म्हणून त्यासाठी तुम्ही 'सिगारेट ओढता कामा नये' असे भाव तुम्ही केले पाहिजेत. तर मग पुढच्या जन्मी तुम्ही पिणार नाही. पूर्वजन्मी भाव केले होते म्हणून हे पितात. पण आता परत नव्याने भावना बदललीत, तर बदलू शकेल असे आहे. कसे आहे? तर सोडण्यासाठी तुम्ही भावना करू शकता. सोडू शकाल की नाही ही वेगळी गोष्ट आहे. आज भावना केलीत तर काही काळानी त्याचे फळ मिळेल. आता फक्त 'दादा भगवान, मला सिगारेट सोडण्याची शक्ती द्या' असे बोलत राहा.

'असीम जयजयकार'चा उपाय

प्रश्नकर्ता : दुसरा काही मार्ग सांगा.

दादाश्री : 'दादा भगवान यांचा असीम जय जयकार' असे

म्हणणे सुरू करा एकदा. मग हळूहळू मन भक्कम व्हायला लागेल. त्यानंतर आम्ही विधी करू. तुम्हाला हे 'दादा भगवान यांचा असीम जय जयकार असो' असे म्हणायला आवडेल का?

प्रश्नकर्ता : हो दादा, नक्कीच आवडेल.

दादाश्री : कुठेही, तुम्ही खोलीत बसून थोडावेळ 'असीम जय जयकार' म्हणा. आठ मिनिटांपेक्षा कमी नाही, यापेक्षा जास्त बोललात तर चांगलेच. वेळ मिळेल तर चांगलेच, नाहीतर आठ मिनिटे तरी बोलायचेच. हे तुम्हाला मदत करील. आतील व्हिटॅमिन आहे हे!

आधार देणारे आणि आधार काढणारे आपणच असतो

तुम्ही सिगारेट-बिगारेट ओढता का? सिगारेट-चहा, नाही?

प्रश्नकर्ता : खरे आहे. सिगारेट कमी ओढतो पण चहा पितो. चहाचे तर व्यसन आहे आणि खूप वाढले आहे. चहा प्यायला आवडते. आवड असते अशावेळी काय करावे?

दादाश्री : हो, आवडतो तर खरा. परंतु जेव्हा आवडणार नाही असा बनलेला असेल, तेव्हा मनात असे येते की या चहात काही दम नाही, मी प्यायलोच नसतो तर बरे झाले असते. त्यानंतर मग अभिप्राय बदलतो, बदलत जातो. असा बदलत बदलत तो एक दिवस शून्य होतो. हे सगळे अभिप्रायामुळेच टिकून राहिले आहे. आधार देणारे पण आपण आणि आधार काढणारे पण आपणच. तरी पण याच्यावर जास्त प्रयोग करू नये. अशा या ज्या रोजच्या आवश्यक गोष्टी आहेत ना, त्यांच्यावर जास्त प्रयोग करता कामा नयेत. कारण त्या गोष्टी जास्त नुकसानकारक नाहीत. इतर अनेक प्रयोग करायला शिल्लक आहेत. चहा तर जरा ठीक आहे, मनाला जरा मौज वाटते. सकाळच्या आणि दुपारच्यावेळी थोडावेळ मौज करविते, ठीक आहे. 'चांगला' म्हटले की चिकटतो, वाईट म्हटले तर पळून जातो.

प्रश्नकर्ता : 'वाईट' आहे असे म्हणायला हवे.

दादाश्री : वाईट आहे असे नाही, 'मला आवडत नाही' असे म्हणालात तर आवडेनाशा होईल. आणि 'मला आवडत नाही' असे रोज म्हणाल तर मग चहा सुटेल. त्याचे असे आहे की सगळे सोडून काय करायचे आहे? हा काही फार नुकसानकारक नाही. पण या इतर वाईट सवयीत मात्र गुंतू नका. ज्यांना या सवयी आहेत त्यांनी त्या हळूहळू बंद कराव्यात. चहासारख्या गोष्टी राहू द्याव्यात, कारण संसारात राहायचे आहे ना, तर किंचित थोडे इनटॉक्सिकेशन (नशा) हवे. म्हणजेच हे राहील आणि इतर वाईट गोष्टी पूर्णपणे काढून टाकायच्या.

[6] व्यसनांपासून सुटण्याचा 'चार स्टेपचा' विलक्षण मार्ग

स्टेप 1 : 'चुकीचे आहे' हे ज्ञान हजर ठेवा

सुटले नाही तरी पण 'चुकीचे आहे' असे ज्ञान निरंतर असावे

प्रश्नकर्ता : मला सिगारेट ओढण्याची वाईट सवय आहे, ही सिगारेट सुटते आणि परत सुरू होते. ती कायमची जावी यासाठी काही व्यवस्थित उपाय सांगा ना!

दादाश्री : यासाठी तू असा भाव ठेव की 'हे चुकीचे आहे, ही वाईट गोष्ट आहे' तर सुटेल.

प्रश्नकर्ता : हो दादा, मला ज्ञान आहे की हे मी जे करत आहे ते चुकीचे आहे आणि मला ते आवडत पण नाही. पण तरी ते सुटतच नाही. तर मग मी काय करू?

दादाश्री : 'सुटत नाही', हे ठीक आहे, पण नेहमीच, 'ही वाईट गोष्ट आहे' असे मानत राहा. ती सुटली नाही तरी मनात 'हे चुकीचे आहे' असा विचार सतत राहायला हवा. 'हे चुकीचे आहे' हे ज्ञान निरंतर, एकक्षणभरही जाता कामा नये. म्हणून हे ज्ञान समजून घ्या की 'हे चुकीचे आहे', तेव्हापासूनच या गाठी तुटत जातील. 'माझ्यासाठी हे अहितकारक आहे' अशी समज त्याला आली, असे ज्ञान त्याला

प्राप्त झाले तर. या जगात फक्त 'ज्ञान' हाच प्रकाश आहे. असे ज्ञान जर त्याला प्राप्त झाले तर तो ती गाठ तोडू शकेल.

स्टेप 2 : 'कसे चुकीचे आहे' ही माहिती गोळा करा

प्रथम समजमध्ये सुटते मग काळानुसार एक्झॅक्ट सुटते

प्रश्नकर्ता : हे सिगारेटचे व्यसन चुकीचे आहे, अशी समज निरंतर राहिली, तर सिगारेट सुटू शकेल का?

दादाश्री : त्या समजेने तर ती सुटेल. समजेने सुटणे म्हणजे काय? तर समजेद्वारा समजुतीतून (अभिप्रायातून) सुटणे. अजून ती प्रत्यक्ष वागणुकीतून सुटलेली नाही. नंतर प्रत्यक्ष सुटायला वेळ लागतो, कालावधी लागतो. प्रथम समजेद्वारा समजुतीतून सुटायला हवे, त्यानंतर ती एक्झॅक्ट सुटेल.

प्रश्नकर्ता : म्हणजे याचा अर्थ असा झाला की आपली समज जर एकदम बळकट झाली तर अमलात येण्याची शक्यता...

दादाश्री : हो, मग अमलात आल्याशिवाय राहणार नाही, गत्यंतरच नाही. समज म्हणजे प्रत्यक्षात, प्रत्यक्ष तसे झाले तर त्याला अमल म्हणतात. अमलात आणावे लागत नाही, तर अमलात येतेच! समजा इथे दोन छोट्याशा बाटल्या आहेत. दोघात पांढरी पावडर आहे. एकात विष आहे आणि एकांत व्हिटॅमिन आहे. विषावर 'विष' लिहिलेले आहे आणि व्हिटॅमिन वर व्हिटॅमिन लिहिलेले आहे पण दोन्ही पावडरी पांढऱ्या आहेत. आता वडिलांना व्हिटॅमिन घेताना जर मुलाने पाहिले तर त्याला वाटते चला, आपण पण चव घेऊन पाहूया. मग तो मुलगा व्हिटॅमिनच्या ऐवजी विष घेतो. घेऊ शकतो की नाही?

प्रश्नकर्ता : घेऊ शकतो.

दादाश्री : दोन्ही पावडरी पांढऱ्या आहेत, सारख्याच दिसतात. त्याला वाचता येत नाही. मग अशावेळी वडिलांनी काय करायला हवे? मुलाला समजावून सांगायला हवे की हे बघ बाळा, या बाटलीतील

पावडर तू घेशील तर तू मरशील. पण 'मरशील' असे म्हटल्यावर त्याला ते ज्ञान समजले असे नाही. फक्त सांगितले तर ज्ञान होईल का? मग मुलगा विचारेल, 'मरून जाईन म्हणजे काय? कुठल्या गावाला जाईन मी?' तेव्हा बाबा सांगतील 'ते आपले काका होते ना? ते मेले, तेव्हा त्यांना तिरडीवर बांधून नेले होते.' तेव्हा मुलाला समजते की मेल्यावर असे बांधून नेतात. म्हणजेच त्याला थोडे जरी समजले तरी मग तो त्या बाटलीला स्पर्श करत नाही. समज फिट झाली की मग तो स्पर्श करणार नाही. तशी ही समज अजून तुमची 'फिट' झालेली नाही. त्यासाठी वेळ लागतो, काळाचा पण हिशोब असतो. जे प्रतीतीत आले आणि समजुतीतही आले ते वर्तनात अवश्य येईल, हे निर्विवाद आहे.

प्रतीती आल्यावर प्रेम कमी होते आणि त्याचे गुण-दोष दिसू लागतात

प्रतीती आली की मग विडीतील गुण-दोष तुम्हाला दिसू लागतात, मग अनुभवात येतो. पूर्वी विडीबद्दल प्रेम होते, तेव्हा गुण -दोष दिसत नव्हते. खोकला आला तर तो या विडीमुळे आला असे नाही, तो तर असा येतच असतो, असे वाटे. प्रतीतीनंतर या विडीमुळे असे होते, तसे होते, असे विडीचे गुण-दोष दिसू लागतात. जेव्हापासून विडीवरचे आपले प्रेम कमी होते तेव्हापासून तिचे गुण-दोष दिसायचे सुरू होतात. आणि जिथे आपले प्रेम असते तिथे अवगुण-दोष असले तरी दिसतच नाहीत. ज्याच्यावर प्रेम असेल त्याच्यात दोष असतील तरी तुम्हाला ते दिसणार नाही, पण जेव्हा प्रेम कमी होते तेव्हा मात्र त्याचे सगळे दोष दिसू लागतात.

स्टेप 3 : चुकीचे वर्तन झाल्यावर पश्चात्ताप करा आणि शक्ती मागा

प्रतिक्रमणाने अभिप्राय बदलतात आणि व्यसनांचा अंत होतो

प्रश्नकर्ता : हे चंदुभाई तंबाखू खातात आणि त्याचवेळी हे

'चुकीचे आहे' असा भाव पण करतात, आणि तरी पण परत खातात. तर त्यासाठी आणखी काय करायला हवे?

दादाश्री : चंदुभाई खातात तर त्यांच्याकडून प्रतिक्रमण करवून घ्या. कारण इथे त्या प्रतिक्रमणाचा अर्थ काय होतो?

प्रश्नकर्ता : प्रतिक्रमण म्हणजे, प्रकृतीमुळे माझ्याकडून कर्म तर होते, पण त्याचा मला पश्चात्ताप होत आहे, मला ते सोडायचे आहे, या प्रकारे.

दादाश्री : हो, प्रश्चात्ताप झाला. पण प्रतिक्रमणाचा अर्थ काय आहे? स्वत: जरी तंबाखू खातो, पण (प्रतिक्रमण केल्यामुळे) तो पूर्वीच्या अभिप्रायाहून विरुद्ध वागला, त्याचा अभिप्राय सुटला. तुमचा अभिप्राय बदलला म्हणजे व्यसनाचे आयुष्य पूर्ण होण्याची तयारी झाली. अभिप्रायामुळे ते जिवंत राहिले होते.

एक व्यक्ती विडी किंवा सिगारेट ओढतो, तेव्हा प्रथम सुरुवातीला त्याची ही सवय मजबूत होते, आणि तोपर्यंत त्याला चांगलेही वाटते पण नंतर कंटाळा येऊ लागतो. आता ही सोडायची आहे असे त्याला वाटते. सोडायची आहे, सोडायची आहे असे वाटते, तेव्हापासूनच त्याचा अभिप्राय बदलला. अभिप्राय एक होता, तोपर्यंत सवय लागली होती. आता त्याचा अभिप्राय तर बदलला, म्हणजे ही सवय सुटणार हे निश्चितच झाले. आता ॲक्शन होणार नाही, फक्त रिॲक्शन राहिली आहे. आता तो ॲक्शन करणार नाही, म्हणून मग ती सवय संपेल. अभिप्राय बदलल्यामुळे (व्यसन) सुटलेच आहे. लोक अभिप्राय बदलवत नाहीत. मी प्रथम अभिप्राय बदलवतो. मला तुमची कार्ये बदलायची नाहीत. मी तुमचा अभिप्रायच बदलतो.

पश्चात्ताप केल्यामुळे आणि शक्ती मागितल्यामुळे करार सुटतात

समजले ना तुला? समजले की नाही?

प्रश्नकर्ता : हो, दादा.

दादाश्री : आणि दुसरे म्हणजे ही नऊ कलमे म्हणा. एका व्यक्तीला मी नऊ कलमे कागदावर लिहून दिल्या होत्या. तो विड्या खूप ओढत असे. म्हणून दहावे कलम विडीचे पण लिहून दिले होते.

प्रश्नकर्ता : विडीचे ?

दादाश्री : ही विडी ओढली, ओढविली, आणि ओढण्याबद्दल अनुमोदन दिले, त्याबद्दल क्षमा मागतो. असे खूप लांबलचक लिहून दिले होते. आणि मी त्याला म्हटले. आता ही दहा कलमे रोज म्हणत जा, आणि त्यातील हे दहावे कलम रोज पंचवीस-पंचवीस, तीस-तीस वेळा म्हणा. मग दोन महिन्यात त्याची विडी सुटली.

कोणी दारू पीत असेल, त्याने नऊ कलमात हे दहावे कलम पण जोडावे की 'मी आजपर्यंत दारू प्यायलो, पाजली, पिण्याबद्दल अनुमोदन दिले, त्यासाठी क्षमा मागतो, आणि आता यापुढे पिणार नाही', असे जर तो रोज बोलू लागेल, तर दारू सुटेल! पीत असेल तरी सुटेल! दारू पीत असेल, दुसरे काही करत असेल, उलटे-सुलटे करत असेल, तरी पण सतत ही शक्ती मागत राहील आणि पश्चात्ताप करील की आजपर्यंत दारू प्यायलो त्याचा पश्चात्ताप करत आहे. आता यापुढे दारू न पिण्यासाठी मला शक्ती द्या. तरी देखील तो पिईल, पण शक्ती मागतच राहायची. तर यामुळे करार मोडत जातील, नाहीतर पुद्‌गलाचा (अहंकाराचा) स्वभाव पलटी मारण्याचा आहे. म्हणून ही भावना करायची आहे.

स्टेप 4 : बाजू कधीही घेऊ नये

सोडायचे आहे, तरी पण त्याची बाजू घेतल्यामुळे आयुष्य वीस वर्षे वाढेल

प्रश्नकर्ता : व्यसन वाईट आहे, ते समजत असते, शक्ती पण मागतो, आटे पण उलगडतो, तरी पण सुटत नाही, तर मग आता कुठे चूक होत आहे, ते जरा समजावून सांगा.

दादाश्री : तो काय करतो? विडीचे आयुष्य वाढवत जातो. विडी सोडायची तर आहे, पण प्रत्यक्षात तो स्वत:च तिचे आयुष्य वाढवतो. एक्सटेन्शन देतो, वीस वर्षे वाढवतो. कसे वाढवतो? तर विडी वाईट आहे हे तो जाणतो. विडी कधीही ओढण्यासारखी गोष्ट नाही असे तो रोज म्हणतो देखील. मी ओढतो हे चुकीचे आहे. विडी ओढणे चुकीचे आहे असे दहा वर्षे मानतो, पण एक दिवस जर कोणी त्याला विचारले 'असे चुकीचे का करता आपण?' त्यावेळी मात्र तो (व्यसनाची) बाजू घेतो आणि म्हणतो 'नाही, त्याला काही हरकत नाही.' म्हणून मग ते व्यसन वीस वर्ष जास्त जगते. अभिप्राय बदलला आहे तरी एक्सटेन्शन देतो. 'हरकत नाही' म्हणतो, असे जे तो म्हणतो, तेव्हा आतील जी विडीची गाठ आहे ती समजते 'हा मालक जो आपल्याला हाकलू इच्छितो, तो तर ढिला आहे' म्हणजेच यामुळे विडीचे आयुष्य वीस वर्षे वाढले.

ही सवय तर मागील जन्माची आहे. पण आता हे नवीन काय झाले? अज्ञानामुळे काय नुकसान झाले? तर खूपच नुकसान झाले. पुढच्या जन्मासाठी पण हिशोब बांधला जातो. आणि अशा प्रकारे ती सुटतच नाही. कारण तिचे समर्थन केलेलेच असते. तुम्हाला नाही वाटत की लोक समर्थन करतात?

प्रश्नकर्ता : हो, करतात. तिच्या समर्थनार्थ वेगवेगळे तर्क देतात. त्यामुळे मग तिला प्रोत्साहन मिळत राहते.

दादाश्री : हो, आणि त्यामुळे मग विडी सुटत नाही.

प्रश्नकर्ता : हो, आणि काही लोक विडी ओढता ओढता असे म्हणतात 'आय स्मोक आउट माय मिजरी. मी माझ्या दु:खांचा धूर करून टाकतो.'

दादाश्री : हो, धूर करून सगळे उडवून देता ना? आता असे म्हणणे म्हणजे ते विडीचे समर्थन करतात. काय करतात? तर विडीचे आयुष्य वाढवतात. पण त्याऐवजी तिथे काय म्हणायला हवे? 'दादा,

तो माझा कमकुवतपणा आहे, एवढा कमकुवतपणा शिल्लक आहे, आता मी तो पण काढून टाकीन' असे सरळ होऊन बोलायला काय हरकत आहे? पण तो सरळ राहतच नाही.

अब्रू जाऊ नये म्हणून बचाव करतो

कोणी सांगितले 'सिगारेट सोडून द्या ना' तर ते म्हणतात, नाही बाबा, तिला काय हरकत आहे? सोडायची काय गरज आहे? असा बचाव करता. याला *'उपराणा'* असे म्हणतात. स्वतःच्या चुकीचे समर्थन म्हणजे *'उपराणा'*. तू कसेही करून बचाव करतोस पण खरे तर तुला आतून सोडायचीच आहे. या सगळ्यांसमोर अब्रू जाईल म्हणून बचाव करतोस. अरे बाबा, अब्रू आहेच कुठे? तर वाचवायला जातोस? तुझा कमकुवतपणा तू कबूल कर, की 'भाऊ हो, माझा कमकुवतपणाच आहे, तुम्हाला तो आज दिसला पण मला तर रोजच दिसतो.' कमकुवतपणाला ताकद कोण म्हणेल?

प्रश्नकर्ता : दादाजी, मी तर अब्रू वाचवण्यासाठी घरात सांगतो की मी विडी ओढत नाही, पण संडासात जाऊन ओढतो.

दादाश्री : लपूनछपून संडासात ओढण्यापेक्षा सरळसरळ सगळ्यांच्या समोर ओढा, कारण सगळ्यांच्या समक्ष ओढणाऱ्याची अब्रू सगळ्यांना कळू दे की काय माणूस आहे! ही अब्रू सर्वांना जाहीरपणे दाखवायला हवी! लोक चंदुभाईची अब्रू पाहायला येण्याऐवजी तुम्हीच तुमची अब्रू दाखवा ना! म्हणा ना 'मी बेकार माणूस आहे.' हजार माणसांसमोर पब्लिकमध्ये तुमची अब्रू जात असेल तरी म्हणा 'बाबा, हा माझा कमकुवतपणा आहे.' जो आपला कमकुवतपणा जाहीरपणे कबूल करतो तो मूळ जागी पोहोचतो. खाजगीत तर सर्वच जण आपला कमकुवतपणा जाहीर करतात.

प्रश्नकर्ता : तुम्ही एकदा म्हणाला होता की विवेक वापरायची गरज आहे. कमकुवतपणा, कमकुवतपणा असे म्हणत त्याचा बचाव करण्याची गरज नाही.

दादाश्री : हो, ते बरोबर आहे. कमकुवतपणा, कमकुवतपणा म्हणत बचाव करण्याची गरज नाही, पण त्यासाठी काय करायला हवे? तर असा कमकुवतपणा मला ठेवायचा नाही, असे वाटायला हवे. तसा निश्चय करायला हवा.

योग्य मार्ग न जाणल्यामुळे सर्व जग अडकले आहे

आता तुम्ही काय करणार? काय म्हणता?

प्रश्नकर्ता : बस, तुम्ही म्हणता तसेच, दादाजी. कमकुवतपणाचा स्वीकार करावा.

दादाश्री : हो, त्याचा स्वीकार करावा. जे चुकीचे आहे त्याला चुकीचे आहे असे तुम्ही स्वीकारायलाच हवे. सरळ सांगा की ही आमची कमजोरी आहे. असे साफ-स्पष्ट केलेत ना, तर याचा शेवट येईल. हाच त्यासाठी मार्ग आहे. हे असे तर फक्त मीच सांगतो. फक्त मीच हा योग्य मार्ग दाखवितो. हा मार्ग माहीत नसल्यामुळे सर्व जग यात अडकले आहे. मार्ग वेगळाच आहे ना! आम्ही कोणत्याच गोष्टीचा बचाव केला नाही, आणि तुम्ही तसा बचाव करत असाल तर ते बंद करा. त्यामुळे (व्यसनाला) एक्सटेन्शन मिळते. प्रत्येक संयोगाला वियोग असतोच, पण हे लोक वियोगाला एक्सटेन्शन देत राहतात, त्यामुळे ते टिकून राहिले आहे. म्हणूनच आम्ही सांगतो अरे, या मार्गाने काढा ना... सरळ मार्गानेच ते निघेल.

प्रश्नकर्ता : दादाजी, ही गोष्ट इतकी सूक्ष्म आहे की कुठेच...

दादाश्री : हो, कुठेच असू शकत नाही. ती पुस्तकात नसते. इतर ठिकाणी नसते. हे सर्व तर मला माझ्या ज्ञानात दिसते.

[7] कुटुंबात कोणाला व्यसन असेल तर...

घरातील लोकांचे प्रेम मिळाले तर व्यसनात पडणार नाही

प्रश्नकर्ता : पतिदेवांची वाईट सवय सुधारण्याचा मार्ग सांगा.

दादाश्री : पतीची वाईट सवय सुधारण्यासाठी तर प्रथम तुम्हाला सुधारावे लागेल. मी सुधारलो आहे, त्यानंतर इथे जे येतात, त्या सर्वांच्या वाईट सवयी हळूहळू कमी होत जातात. म्हणून जेव्हा तुम्ही सुधाराल तेव्हा मग मुलाच्या किंवा नवऱ्याच्या सर्व वाईट सवयी कमी होत जातील.

प्रश्नकर्ता : दादाजी, माझ्या नवऱ्याची ब्रँडी सुटतच नाही, तर मग अशावेळी मी काय करावे?

दादाश्री : तो ब्रँडी पिणार नाही असे प्रेम तुम्ही द्या ना, मग ते ब्रँडी पण बंद करतील. घरात त्यांना प्रेम मिळत नाही म्हणून मग बाहेर जाऊन पितात. घरात त्यांना प्रेम मिळाले तर ते सर्व सोडतील. प्रेमासाठी प्रत्येक गोष्ट सोडायला तयार असतात. त्यांना प्रेम दिसत नाही म्हणून मग ते दारूवर प्रेम करतात, इतर कोणावर प्रेम करतात. किंवा समुद्रतटावर भटकत राहतात. 'अरे बाबा, तिथे तुझ्या बापाचे काही ठेवले आहे का? घरी बस ना!' तर म्हणतात 'मला घरी आवडतच नाही.' म्हणजेच काहीतरी विचार करावा लागेल. असे कधीपर्यंत चालेल! घरात प्रेम वाढवा. मुले पण खुश होतील आणि ते जे बाहेर धावाधाव करतात, ती करणार नाहीत, ते घरी येऊ लागतील.

व्यसन असेल तिथे रागावू नये, त्यांना समज द्यावी

प्रश्नकर्ता : दादाजी, आमची मुले मांस खातात, दारू पितात, असे सर्व करतात. याचा काय परिणाम होईल आणि हे कसे बंद करता येईल?

दादाश्री : त्यांना समजावून सांगाल तर होऊ शकेल. सतत मारपीट करण्याने होणार नाही. तुम्ही त्यांना एवढेच सांगायला हवे की 'हे आपल्याला शोभत नाही. आपण खानदानी कुटुंबातील आहोत, असे आपल्याला शोभत नाही. यामुळे प्रकृती बिघडते.' अशा सर्व गोष्टी सांगायला हव्यात. मारायचे किंवा ओरडायचे नसतेच. तसे करायचे नसतेच. त्यांना समजावून सांगावे की हे आपल्याला शोभत नाही. असे

आहे, तसे आहे वगैरे. तरी पण ते ऐकत नसतील तर परत समजावून सांगा. तरी पण ऐकत नसतील तर परत सांगा. त्यांची उदयकर्मे जेव्हा शांत होतील, तेव्हा तुम्ही दिलेले ज्ञान त्याला आठवेल. तुम्ही जर त्याला रोज असे समजावत असाल ना, तर तो मनात ठरवेल की तुमचे म्हणणे बरोबर आहे. माझे बाबा बोलतात ते बरोबर आहे, पण मला असे करायचे नाही तरी पण माझ्याकडून असे होऊन जाते. त्यांचे म्हणणे खरे आहे, खरे आहे, असे निश्चित करत-करत एक दिवस खरेच तसे होते (तो वाईट सवयी सोडून देतो).

पण तुम्ही तर खूप काही सांगता आणि रागावता, तर त्याचा बिचाऱ्याचा पण अहंकार तर असतोच ना, त्याला वाटते 'का सारखे सारखे रागवत असता? माझी इच्छा तर नाही तरी पण रोज रागवतात.' म्हणून मग तो उलट वागतो. मुले तर मनात ठाम ठरवतात की 'आता तुम्ही हवे तितके रागवा, पण आम्ही तर हे करणारच.' म्हणजे त्यांना जे मनात वाटत असते की हे वाईट आहे, वाईट आहे, त्यांना जे ज्ञान होते ते पण बदलते, आणि 'करणारच' असा निश्चय ते करतात. दृढ निश्चय करतात 'जा, आता जे व्हायचे असेल ते होवो, तुम्हाला जे करायचे असेल ते करा', असे म्हणतील. आणि तरी जर त्याला आणखी जास्त मारलेत तर तो मनात ठरवतो, मोठा झाल्यावर मी यांना मारल्याशिवाय सोडणार नाही. हे अशाप्रकारे काम करते.

रोग किंवा व्यसन, दोन्ही कर्मांच्या उदयामुळे

आपले लोक सतत रागवत असतात, कटकट करत असतात, मारत असतात. परंतु तो जेव्हा आजारी पडतो तेव्हा त्याला रागावत नाहीत. याचे काय कारण? 'असे काही झाले तर कोणी रागावतात का?'

प्रश्नकर्ता : नाही, अशावेळी रागावत नाहीत.

दादाश्री : असे का? ते पण कर्माच्या उदयामुळे होते आणि हे (व्यसन) पण कर्माच्या उदयामुळेच होते. त्याची पण अंतरायकर्मे असतील तेव्हाच ना! विसाव्या वर्षी टायफॉईड होतो, तो पण एक रोग

आहे आणि कर्माच्या उदयामुळे होतो. त्याचप्रमाणे लोक विड्या ओढतात, सिगारेट ओढतात, हॉटेलमध्ये खातात-पितात, ते पण कर्माच्या उदयामुळे होते, एक प्रकारचा रोगच आहे. हे सगळे कर्माच्या उदयामुळे आहे. संयोग मिळाले की तो चुकीच्या मार्गाला लागतो. लोक म्हणतात सुद्धा की अरे, तू कुसंगी झाला आहेस. अहो, पण हे सगळे संयोगामुळे होत आहे, यात त्याचा काय दोष? म्हणजे हे सर्व असे आहे.

खरेतर नैसर्गिकरीत्या सुधारणार असते म्हणून ते सुधारतात. नाहीतर कुठलाही बाप सुधारत नाही. अहो, बापच सुधारला नव्हता ना!

प्रश्नकर्ता : पण याप्रकारे संपूर्ण तर कोणीच नसतो ना?

दादाश्री : तुला संपूर्णाशी काय करायचे आहे? संपूर्णाबरोबर आपले कामच नाही. पण आपला व्यवहार चालवेल एवढे तरी हवे ना! आपला जो व्यवहार आहे तो तरी नीट चालवता आला पाहिजे. तुमच्यामुळे बिचाऱ्या मुलांचे बिघडणार नाही, एवढे तरी करायला हवे ना? तुमच्या घरी जेवढे आहेत तेवढ्यांचेच, इतरांचे, शेजाऱ्यांचे नाही. तुमची शक्ती असेल तर शेजाऱ्यांचे पण करा. पण प्रथम आपल्या लोकांना तर सरळ करा. व्यवहार सुंदर असायला हवा.

[8] अक्रम विज्ञानाची ही देणगी-व्यसनीला मोक्षमार्गाकडे वळविले

'व्यसनी का?' असे आम्ही विचारीत नाही

प्रश्नकर्ता : विडीचे व्यसन असेल, चहाचे व्यसन असेल तर त्याला मोक्ष मिळतो का?

दादाश्री : मोक्षासाठी कोणाला कसलीच अडचण नसते. मोक्ष बंधनकारक नाही. जो सरळ होईल, त्याचा मोक्ष. मोक्ष स्वत:च सरळ स्वभावाचा आहे. जो कोणी सरळ होईल त्याचा मोक्ष होईल. ही विडी आणि चहा याच्याबद्दल त्याला स्वत:लाच समजेल की या गोष्टी तर

आपल्याला बांधून ठेवीत आहेत. ही संकटे माझ्या मागे लागली आहेत. हे त्याला कळेल आणि तो आपणहूनच त्या संकटापासून दूर होईल.

प्रश्नकर्ता : दादा, तुमच्याकडे तर दारूडे आले, तर त्यांनाही तुम्ही 'दारू का पितोस', तू दारू पिता कामा नये, असे कधीच म्हटले नाही.

दादाश्री : त्याला असे म्हणता कामा नये. मी काय म्हटले आहे? की तू व्यसनी झाला आहेस, त्याबद्दल माझी काहीच तक्रार नाही, पण जे व्यसन लागले आहे त्यासाठी तू भगवंताकडे प्रतिक्रमण कर. लोक तक्रार करतात की 'तू दारू का पितोस?' अरे बाबा, असे विचारून तुम्ही त्याला जास्त बिघडवत आहात. त्याचे अहित करत आहात.

प्रश्नकर्ता : पण दादा, ते त्यातच सुख मानतात, त्याचे काय?

दादाश्री : मानतात. ते मानोत पण त्यांना आतून तर वाटतेच ना! ते तोंडाने काही बोलत नाहीत. पण मनात मात्र खूप विटलेले असतात. ते त्यांचे मागच्या जन्माचे संस्कार आहेत, पण आजचे संस्कार असे नाहीत. खरे म्हणजे आज तर पश्चात्ताप होत असतो की असे नाही झाले तर चांगले. पश्चात्ताप होत नाही का? कसा पश्चात्ताप होतो? तर असे नाही झाले तर चांगले, तरी पण होऊनच जाते, कारण मागील जन्माचे संस्कार आहेत ना!

ज्यांना कोणी सांभाळत नाही त्यांना दादा सांभाळतात

प्रश्नकर्ता : हो, म्हणजे संतांची किंवा दादा भगवानांची कृपा असते पण कृपेला पात्र होण्यासाठी आणि ती आचरणात आणण्यासाठी त्या व्यक्तीला प्रयत्न तरी करायला हवेत ना?

दादाश्री : असे आहे की, यासाठीच तर आम्ही अक्रम मार्ग काढला आहे, अक्रम!

प्रश्नकर्ता : अक्रम म्हणजे त्यात क्रमच नाही?

दादाश्री : क्रमच नाही, कारण हे लोक क्रमानेच तर दिवाळे

निघेल अशा स्थितीत आले आहेत. त्यांचा जो क्रम आहे त्या क्रमात जर सुधारणा करायला गेलो तर दिवाळे निघेल अशा स्थितीत आहेत. तर मग त्यात सुधारणा कशी होईल?

प्रश्नकर्ता : खूप वेळ लागेल आणि लोक खूप दुःखी होतील.

दादाश्री : आणि एक पण गुण सुधारत नाही, साधूंचा पण सुधारत नाही ना! म्हणून आम्ही सायंटिफिकरीत्या शोध लावला तेव्हा आढळले की सध्या हा रस्ताच चुकीचा आहे. म्हणून आता मला हा वेगळा मार्ग स्वीकारावा लागला. पूर्ण अक्रम विज्ञान. हे पूर्ण सैद्धांतिक विज्ञान आहे. ताबडतोब फळ देणारे! आचरण बदलवत नाही. आचरण तर जेवढे आतमध्ये असेल ते जेव्हा संपेल तेव्हा बदलेल.

प्रश्नकर्ता : क्रमिक मार्गात तर त्याग करायला सांगतात.

दादाश्री : हो, त्याग करा, त्याग करा. सर्व व्यसनांचा त्याग करा. व्यसनांचा त्याग प्रथम करून घेतात आणि त्यानंतरच आतमध्ये प्रवेश देतात. तर मग या बिचाऱ्या लोकांचे काय करायचे? या लोकांसाठी हॉस्पिटल नको का? म्हणून आपल्या हॉस्पिटलमध्ये आपण सर्वांना ठेवतो. ज्याला कोणी ठेवत नाही त्याला आम्ही आमच्या येथे ठेवतो. आणि मी जर आदल्या दिवशी म्हटले असते की ताबडतोब व्यसन सोडा आणि मगच येथे या, तरच मी ज्ञान देईन. तर तो निघूनच गेला असता.

स्वतःचा संसार रोग गेलेला आहे, म्हणूनच दुसऱ्यांचा पण काढून देतात

प्रश्नकर्ता : दादाजी, पण तो रोगी तर आहेच ना?

दादाश्री : सगळेच रोगी आहेत ना! म्हणून दारू प्यावी लागते. दारू का प्यावी लागते? सिगारेट का ओढावी लागते? रोगी आहेत म्हणून. चहा का प्यावा लागतो? तर रोगी आहेत, विडी-दारू हे सर्व रोग आहेत. रोग आहेत म्हणून त्यावर औषधोपचार करा.

प्रश्नकर्ता : पण दादाजी, तुम्ही तर असे हॉस्पिटल उघडले आहे की तिथे 'तू हे दुखणे कुठून आणलेस, तुझे दुखणे काय आहे? असे तुम्ही कोणाला विचारतच नाही. सरळ दुखणेच दूर करता.

दादाश्री : दुखणे कुठून आणलेस? असे विचारणे हा गुन्हा आहे. दुखणे म्हणजे, हा तर संसार-रोग आहे. या रोगात तऱ्हेतऱ्हेची डिझाईन्स असतात, पण नाव एकच, 'संसार-रोग'! डिझाईन्स वेगवेगळी असतात, तऱ्हेतऱ्हेची डिझाईन्स असतात, पण रोग एकाच प्रकारचा, 'संसार-रोग'! माझा संसार रोग गेलेला आहे म्हणून मी तुमचा काढू शकतो. आता तुमचा निघाला ना बरोबर!

प्रश्नकर्ता : दादा, तुम्ही ही जी जन्मोजन्मीच्या रोगांसाठी औषधे दिली आहेत. म्हणून आता (सर्व रोग) निघूनच जातील ना!

दादाश्री : हो, हो. पाहा ना, आणि रोग पण जातात ना! हे पण आश्चर्यच आहे ना! संसार रोगासाठी कुठलेही औषध नाही, फक्त ज्ञानी पुरुष सोडून. जे संसार रोगातून मुक्त झाले आहेत, या शिवाय (त्यांच्याकडे जाण्याशिवाय) दुसरे कोणतेच औषध नाही. पाहा तरी, तुम्हाला कसे दादा मिळाले आहेत, रोग एकदम काढूनच टाकला.

आणि आमचे हे विज्ञान असे आहे की ज्यामुळे सर्व दोष संपतात. आपले हे विज्ञान कसे काम करते? संसार-रोगाचा नाश करते. जेवढा रोग नष्ट होतो, तेवढ्या रोगापासून रक्षण करते. जेवढा रोग नष्ट होतो, तेवढे आरोग्य सुधारते, त्या आरोग्याचे हे विज्ञान रक्षण करते आणि नवीन रोग उत्पन्न होऊ देत नाही, असे आपले विज्ञान आहे. सर्व प्रकारचे रोग जातात. शरीराचे रोगही जातात, संसार-रोग पण जातो आणि मोक्षाचे पण काम होते, सगळेच होते.

- जय सच्चिदानंद

दादा भगवान फाउन्डेशनची प्रकाशित मराठी पुस्तकें

1. भोगतो त्याची चूक
2. एडजस्ट एवरीव्हेर
3. जे घडले तोच न्याय
4. संघर्ष टाळा
5. मी कोण आहे ?
6. क्रोध
7. चिंता
8. प्रतिक्रमण (सं, ग्रंथ)
10. भावना सुधारे जन्मोजन्म
11. कर्माचे विज्ञान
12. पाप-पुण्य
13. आई-वडील आणि मुलांचा व्यवहार (सं)
14. पति-पत्नीचा दिव्य व्यवहार (सं)
15. समजपूर्वक प्राप्त ब्रह्मचर्य (सं)
16. मानव धर्म
17. मृत्युवेळी, आधी आणि नंतर
18. सेवा-परोपकार
19. दान
20. त्रिमंत्र
21. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
22. चमत्कार
23. सत्य-असत्याचे रहस्य
24. वाणी, व्यवहारात (सं)
25. पैशांचा व्यवहार (सं)
26. क्लेश रहित जीवन
27. निजदोष दर्शनाने... निर्दोष!
28. प्रेम
29. गुरू-शिष्य
30. अहिंसा
31. आप्तवाणी - 1 ते 8
39. आत्मसाक्षात्कार
40. जगत् कर्ता कोण ?
41. कर्माचा सिद्धांत
42. व्यसन मुक्तीचा मार्ग

हिन्दी

1. आत्मसाक्षात्कार
2. ज्ञानी पुरुष की पहचान
3. सर्व दु:खों से मुक्ति
4. कर्म का सिद्धांत
5. आत्मबोध
6. मैं कौन हूँ ?
7. पाप-पुण्य
8. भुगते उसी की भूल
9. एडजस्ट एवरीव्हेयर
10. टकराव टालिए
11. हुआ सो न्याय
12. चिंता
13. क्रोध
14. प्रतिक्रमण (सं, ग्रं)
16. दादा भगवान कौन ?
17. पैसों का व्यवहार (सं, ग्रं)
19. अंत:करण का स्वरूप
20. जगत कर्ता कौन ?
21. त्रिमंत्र
22. भावना से सुधरे जन्मोंजन्म
23. चमत्कार
24. प्रेम
25. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य (सं, पू, उ)
28. दान
29. मानव धर्म
30. सेवा-परोपकार
31. मृत्यु समय, पहले और पश्चात्
32. निजदोष दर्शन से... निर्दोष
33. पति-पत्नी का दिव्य व्यवहार (सं)
34. क्लेश रहित जीवन
35. गुरु-शिष्य
36. अहिंसा
37. सत्य-असत्य के रहस्य
38. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
39. माता-पिता और बच्चों का व्यवहार (सं)
40. वाणी, व्यवहार में... (सं)
41. कर्म का विज्ञान
42. सहजता
43. आप्तवाणी - 1 से 9
52. आप्तवाणी - 12 (पू, उ)
54. आप्तवाणी - 13 (पू, उ)
56. आप्तवाणी - 14 (भाग-1 से 4)
60. ज्ञानी पुरुष (भाग-1)
61. व्यसन मुक्ति का मार्ग
62. पहचानें अंत:करण को

(सं - संक्षिप्त, ग्रं - ग्रंथ, पू - पूर्वार्ध, उ - उत्तरार्ध)

★ दादा भगवान फाउन्डेशन द्वारे गुजराती आणि इंग्रजी भाषेत सुद्धा बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहे. वेबसाइट www.dadabhagwan.org वर सुद्धा आपण ही सगळी पुस्तके प्राप्त करू शकता.

★ प्रत्येक महिन्यात हिन्दी, गुजराती आणि अंग्रेजी भाषेत दादावाणी मेगेझीन प्रकाशित करीत आहे.

संपर्क सूत्र

दादा भगवान परिवार

अडालज (मुख्य केन्द्र) : **त्रिमंदिर**, सीमंधर सिटी, अहमदाबाद-कलोल हाईवे, पोस्ट : अडालज, जि.-गांधीनगर, गुजरात - 382421
फोन : +91 79 3500 2100, +91 9328661166/77
E-mail : info@dadabhagwan.org

मुंबई : **त्रिमंदिर,** ऋषिवन, काजुपाडा, बोरिवली (E)
फोन : 9323528901

पुणे : **त्रिमंदिर,** पुणे-बेंगलुरू हाईवे, खेड शिवापुरच्या जवळ, वर्वे बुद्रूक, जिला-पुणे, महाराष्ट्र **फोन** : 7203098409

ठाणे : **त्रिमंदिर**, ग्लोबल हॉस्पिटलच्या बाजूला, साकेत-बालकुम रोड, माजीवाडा, **फोन** : 9213020500

दिल्ली	9810098564	**जलगाँव**	9420942944
चंडीगढ	9780732237	**पुणे**	7218473468
जालंधर	9814063043	**नागपुर**	9403399377
हिसार	9255411280	**अमरावती**	9422915064
जयपुर	9928650014	**बेंगलुरू**	9590979099
लखनऊ	9118735529	**हैदराबाद**	9885058771
वाराणसी	9795228541	**चेन्नई**	9441770916
पटना	7352723132	**रायपुर**	9179025061
भोपाल	9826926444	**भुवनेश्वर**	7077902158
इन्दौर	9229500845	**कोलकाता**	9830080820

U.S.A. : **DBVI Tel. :** +1 877-505-DADA (3232),
Email : info@us.dadabhagwan.org
U.K. : +44 330-111-DADA (3232)
Kenya : +254 795-92-DADA (3232)
UAE : +971 557316937
Dubai : +971 501364530
Australia : +61 402179706
New Zealand : +64 21 0376434
Singapore : +65 91457800

www.dadabhagwan.org

सुटतात व्यसने अशाप्रकारे

व्यसनातून मुक्त होण्यासाठी हे 'चुकीचे आहे' असा विचार निरंतर असायला हवा. कोणी विड्या ओढत असेल, त्याला आवडत नसेल, (तरी) सुटत नसेल, तर भगवंताकडे सतत शक्ती मागत राहावी, की 'मी पिऊ नये, कोणाला पाजू नये आणि पिण्याप्रती अनुमोदन देऊ नये, अशी मला शक्ती द्या' तर यामुळे करार संपत जातील. कोणी जर असे म्हणाले की, 'असे चुकीचे का करत आहात?' तर त्यावेळी तुम्ही समर्थन करू नका. व्यसनाचे समर्थन केले नाही, तर त्याचा अंत येईल.

व्यसन जरी सुटले नाही तरीही हे शंभर टक्के चुकीचेच आहे, असा निश्चय कधी ढळता कामा नये. तुमचे निश्चयबल हवे, आम्ही वचनबल देण्यासाठी तयार आहोत. सर्व काही आपोआप सुटते, आमच्या शब्दांनीच!

– दादाश्री

DBF • Adalaj

ISBN 978-81-992022-3-8

Printed in India

Price ₹50